बिसेन डेन्टल केअर
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)
दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)
ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०

साप्ताहिक http://berartimes.com
बेरार टाईम्स
मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे

गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध

आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१४ गोंदिया | अंक ०१ | बुधवार,दि.११ डिसेंबर २०२४ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2022-2024

बांग्लादेशातील हिंदूवरील अन्याया विरोधात गोंदियात सकल हिंदू समाजाची मोटारसायकल रॅली

गोंदिया– गेल्या महिन्याभरापासून बांगलादेशमध्ये हिंसाचार उफाळलाय. गेल्या काही दिवसांपासून बांगलादेशात हिंदूंवर होणाऱ्या हिंसाचाराच्या घटनाही वाढल्या आहेत. दरम्यान हिंदूंवर होणाऱ्या हल्ल्यांचा आता भारतभर रोष दिसून येत आहे. बांगलादेशात हिंदूंवर होणाऱ्या अत्याचाराचा विरोधात गोंदियात सकल हिंदू समाजाच्यावतीने मोटारसायकल रॅली काढून जिल्हाधिकारी यांना निवेदन सादर करण्यात आले.

बांगलादेशातील हिंदू, बौद्ध, जैन आणि अन्य अल्पसंख्यकांवर होणारे हल्ले, त्यांच्या हत्या आणि उत्पीडनाच्या विरोधात सकल हिंदू समाजाच्या वतीने १० डिसेंबर रोजी शहरातील जयस्तंभ चौकातून बाईक रॅली काढण्यात आली.ही बाईक रॅली शहरातील प्रमुख मार्गाने रॅली भ्रमण करीत जिल्हाधिकारी कार्यालयात पोचल्यानंत विविध मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकारी यांच्यामाफर्त राष्ट्रपती, प्रधानमंत्री यांना पाठविण्यात आले. सकल हिंदू समाजाच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले, इस्कॉन आणि आर्ट ऑफ लिविंग या संस्थेने १९७१ च्या दुष्काळात लाखो बांगलादेशी नागरिकांना चार महिने भोजनदान केले. त्याच इस्कॉनच्या चिन्मयदास प्रभूंना बांगलादेश पोलिसांनी राष्ट्रद्रोहाच्या आरोपाखाली अटक केली. त्यांना कायदेशीर मदत मिळू नये म्हणून त्यांच्या वकिलाचीही हत्या केली.

बांगलादेशात अराजकता माजवून हिंदू, बौद्ध, जैन व इतर अल्पसंख्यांकावर अन्याय–अत्याचार केला जात आहे. या विरोधात शहरात २२ सप्टेंबर रोजी भव्य रॅली काढून विविध मागण्यांसंदर्भात निवेदनही केंद्र शासनाला पाठविण्यात आले होते, यानंतरही यावर शासनाने योग्य ती पावले उचललेली नाही. केंद्र शासनाने बांगलादेशात होणाऱ्या हिंदू व अल्पसंख्यांकावरील अत्याचाराविरोधात योग्य ती पावले उचलावी, बांगलादेशातील सरकारवर दबाव बनवून तेथील हिंदू व अल्पसंख्याकांचे रक्षण करावे, यासाठी आज १० डिसेंबर रोजी शहरातील प्रमुख मार्गाने बाईक रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

या रॅलीत देवेश मिश्रा, हरीश अग्रवाल, सचिन मिश्रा, सुनील तिवारी, प्रीतम लिल्लारे वीरेंद्र बिसेन, विनोद हरीणखेडे, नितीन जिंदल, ओमप्रकाश मेठी, देवा यादव, लालू शर्मा, जय चौरसिया, मुन्ना उरकुडे, राजू जैन (छोटा), तिलक लारोकर, तोलाराम मनकानी, दयानंद आसवानी, अजय यादव, दिलीप चांदवानी, विनायक गजघाट आदी मान्यवर सहभागी झाले होते.

१६ डिसेंबरपासून नागपुरात हिवाळी अधिवेशन, आठवडाभराच्या कालावधीत विदर्भाचा प्रश्न सुटणार?

नागपूर :विधिमंडळाचे नागपूर हिवाळी अधिवेशन यंदा पाचच दिवसाचे म्हणजे १६ ते२१ डिसेंबर याच दरम्यान होणार असून ती केवळ औपचारिकता ठरणार आहे. विदर्भाचे प्रश्न सुटावे त्यावर विधिमंडळात चर्चा व्हावी म्हणून नागपूरमध्ये हिवाळी अधिवेशन घेतले जाते. त्याची गांभीर्य दिवसेंदिवस कमी होत गेले.

आता तर ती केवळ औपचारिकता म्हणून हे अधिवेशन अक्षरश: उकले जाते. यदा सरकार नवीन आहे हे कारण देत अधिवेशन पाच दिवसाचे होणार,अशी माहिती आहे. त्यामुळे यातून विदर्भाच्या हाताला काही लागण्याची शक्यता कमीच आहे.

विधानसभा निवडणुकीत महायुतीचा महाप्रचंड विजय झाला आहे. ज्यामध्ये पुन्हा भाजपच सर्वात मोठा पक्ष ठरला. देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. तसेच एकनाथ शिंदे आणि अजित पवार हे उपमुख्यमंत्री विराजमान झाले आहेत. नवे सरकार स्थापन झाल्याने मुंबईत विशेष अधिवेशन बोलावण्यात आले ज्याचा सोमवारी समारोप झाला. तर विधीमंडळाचे नागपूर हिवाळी अधिवेशन १६ डिसेंबरला सुरू होणार आहे. नागपुरात होणारे अधिवेशन अल्पावधीचे ठरणार आहे. या आठवडाभरात विदर्भाशी संबंधित सर्व प्रश्न मार्गी लागणार की नाही, ही चर्चा जोर धरु लागली आहे.

राज्याचे तीन दिवसीय विशेष अधिवेशन मुंबईत आयोजित करण्यात आले होते. जिथे आमदारांचा शपथविधी, विधानसभा अध्यक्षांचा शपथविधी, ठराव आणि राज्यपालांचे अभिभाषण असे सोपस्कार पार पडले आहेत. विधानसभेच्या तीन दिवसांच्या विशेष अधिवेशनानंतर १६ डिसेंबरपासून नागपुरात हिवाळी अधिवेशनाला सुरु होत आहे. यंदाचे नागपूर हिवाळी अधिवेशन १६ डिसेंबरपासून सुरू होणार असून ते २१ डिसेंबरपर्यंत चालणार आहे.

विधानसभा सचिवालयाने जारी केलेल्या सूचनेनुसार १२ डिसेंबरपासून सचिवालय नागपुरात दाखल होणार आहे. तर १५ डिसेंबरला संपूर्ण सरकार आणि विरोधी पक्ष नागपुरात दाखल होणार आहे. मात्र अधिवेशन केवळ एकच आठवड्याचे असल्याने राज्याच्या प्रश्नांचे हा मोठा सवाल उपस्थित होत आहे.

नागपूर कराराचे उल्लंघन?

नागपूर करारानुसार नागपुरात होणारे हिवाळी अधिवेशन किमान चार आठवड्यांचे असावे, अशी पूर्वअट आहे. ज्यामध्ये विदर्भाशी संबंधित सर्व प्रश्नांकडे लक्ष देऊन त्यावर उपाययोजना केली जावी. मात्र, नागपूर कराराचे उल्लंघन गेल्या काही वर्षांपासून सुरूच आहे. नागपुरात झालेल्या अधिवेशनाचा कालावधी तीन आठवड्यांहून अधिक झालेला नाही. यावेळी केवळ एक आठवड्याचे अधिवेशन होत असल्याने अनेक प्रकारचे प्रश्न उपस्थित होऊ लागले आहेत. अनेक समस्यांशी झगडणाऱ्या विदर्भाचे प्रश्न आठवडाभरात सुटतील का, त्यांना न्याय मिळेल का? असा प्रश्न विदर्भातील जनतेकडून उपस्थित केला जात आहे.

आचारसंहिता संपली,मात्र जि.प. पदाधिकारी निवडणूकीचा मुहूर्त निघेना

गोंदिया–येथील जिल्हा परिषद अध्यक्ष, उपाध्यक्ष व सभापतींचा अडीच वर्षांचा कार्यकाळ ९ नोव्हेंबरला पूर्ण झाला.राज्य विधीमंडळाच्या निवडणुकीमुळे अडीच वर्षांच्या कालावधीसाठी पदाधिकाऱ्यांची निवड करण्याचा कार्यक्रम जाहीर झाला नव्हता.त्यामुळे विद्यमान पदाधिकारी यांना एक ते दोन महिन्याचा अधिकचा कालावधी मिळाला.तर पुढच्या काळातील पदाधिकाऱ्यांना मात्र कमी कालावधी मिळणार असल्याने त्यांच्यावर प्रशासन अन्यायाची मालिका कार्यक्रमाची घोषणा न करताच सुरु ठेवल्याचे बोलले जात आहे.

आता निवडणुका आटोपल्या असून लवकरच जिप अध्यक्ष, उपाध्यक्ष, सभापती यांच्या पुढील अडीच वर्षांसाठी पद निवडीचा कार्यक्रम प्रशासनाकडून जाहीर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे पुढील अध्यक्ष, उपाध्यक्ष व सभापती पदाची माळ कुणाच्या गळ्यात पडणार याची उत्सुकता जिल्हावासीयांना लागली आहे.

जिल्हा परिषदेचे विद्यमान अध्यक्ष पंकज रहांगडाले, उपाध्यक्ष यशवंत गणवीर, बांधकाम व अर्थ सभापती संजय टेंभरे, कृषी व पशुसंवर्धन सभापती रुपेश कुथे, महिला व बालकल्याण सभापती सविता पुराम, समाजकल्याण सभापती पूजा सेठ यांची अडीच वर्षांच्या कालावधीसाठी निवड करण्यात आली होती. या सर्व पदाधिकाऱ्यांचा अडीच वर्षांचा कालावधी ९ नोव्हेंबर २०२४ रोजी पूर्ण झाला. त्यामुळे पुढील कालावधीसाठी अध्यक्ष, उपाध्यक्ष, सभापती यांची निवड करण्यासाठी निवडणूक कार्यक्रम विधानसभा निवडणुकीमुळे लांबणीवर गेला होता. आता निवडणुक पार पडून नविन सरकार स्थापन झाले आहे. प्रशासनसह नेते मंडळी सुद्धा थोडे निवांत झाले आहेत. नवीन जि.प. पदाधिकाऱ्यांची निवड करण्याचा कार्यक्रम लवकर जाहीर होण्याची शक्यता आहे.

५३ सदस्यीय गोंदिया जिल्हा परिषदेमध्ये भाजपाचे २६ सदस्य, काँग्रेस १३, राष्ट्रवादी काँग्रेस ८, चाबी संघटना ४ व अपक्ष २ असे पक्षीय बलाबल आहे. राष्ट्रवादी व दोन अपक्षांनी भाजपाला पाठिंबा देत सत्ता स्थापन केली होती.आता चाबी संघटना सुध्दा भाजपमय झाल्याने अध्यक्ष उपाध्यक्ष निवडीत गोंदियाचे आमदार विनोद अग्रवाल यांची आता महत्वाची भूमिका राहणार आहे. पुढील कालावधीसाठी अध्यक्ष, उपाध्यक्ष व सभापती पदासाठी अनेकांची नावे चर्चेत असली तरी माळ कुणाच्या गळ्यात पडणार याची उत्सुकता जिल्हावासीयांनी लागली आहे.त्यातच अध्यक्षपदाची धुरा आमगाव,देवरी,सडक अर्जुनी की अर्जुनी मोरगावकडे जाते यावरही बरेच राजकीय समीकरण ठरणार आहेत.

महायुतीत कुणाला लागणार मंत्रीपदाची लॉटरी?

मुबंई–५ डिसेंबरला देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री तर एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतली. यानंतर सर्वांचं लक्ष आता मंत्रीमंडळ विस्तराकडे लागलं आहे. येत्या १४ डिसेंबरला काही जणांच्या गळ्यात कॅबिनेट मंत्रीपदाची, तर काहींच्या गळ्यात राज्यमंत्री पदाची माळ पडणार असल्याचं समजतंय. महायुतीमध्ये मंत्रीमंडळात कुणाची वर्णी लागणार, याची संभाव्य यादी समोर आली आहे.

शिवसेना शिंदे गट संभाव्य यादी–उदय सामंत, तानाजी सावंत,शंभूराजे देसाई, दादा भुसे, गुलाबराव पाटील, राजेश क्षीरसागर, आशिष जैस्वाल, प्रताप सरनाईक, संजय शिरसाट, भरत गोगावले.तर

राष्ट्रवादी (अजित पवार गट) संभाव्य यादी –आदिती तटकरे,हसन मुश्रीफ, छगन भुजबळ,धनंजय मुंडे,धर्मरावबाबा अत्राम,अनिल पाटील,दत्ता भरणे यांच्या नावाची चर्चा आहे.यावरुन प्रफुल पटेलांनी आपल्या जिल्ह्यात मंत्रीपद मागितले नाही हे दिसून येत आहे.

जलाशयांवर परदेशी पाहुण्यांचा स्वच्छंद विहार,पक्षी प्रेमींना पर्वणी



नवेगावबांध : गोंदिया जिल्हा तलावांचा जिल्हा म्हणून ओळखला जातो. जिल्ह्यात मोठे ९, तर मध्यम १८ आणि लघु ४२ सिंचन प्रकल्प आहेत. यापैकी जिल्ह्यातील काही जलाशय आणि तलाव परिसरात दरवर्षी हिवाळ्याला सुरुवात होताच विदेशी पक्ष्यांच्या आगमनाला सुरुवात होते.

विशेषतः युरोपीयन देश तसेच मंगोलिया, सायबेरिया परिसरातून विदेशी पक्षी मोठ्या प्रमाणात नोव्हेंबर महिन्यात दाखल होतात. जिल्ह्यातील तलाव व पक्ष्यांचे आवडते खाद्य येथे उपलब्ध असल्याने मोठ्या संख्येने विदेशी पक्ष्यांचे आगमन होते. सध्या नोव्हेंबरच्या शेवटच्या आठवड्यापासून गोंदिया जिल्ह्यातील विविध जलाशयांवर विदेशी पाहुण्यांचे आगमन होण्यास सुरुवात झाली आहे.जिल्ह्यातील जलाशयांवर विदेशी पक्ष्यांचा क्रम मागील १५ ते वीस वर्षांपासून कायम आहेत. यात कसलाही बदल अथवा खंड पडलेला नाही. दरवर्षी या पक्ष्यांच्या संख्येत वाढ होत असल्याचे पक्षी निरीक्षकांनी सांगितले.

हजारो कि.मी.चा प्रवास करुन होतात हे पक्षी दाखल

युरोपीयन देशात वाढत्या थंडीमुळे येथे स्थलांतरित पक्ष्यांचे आगमन सुरू झाले आहे. अनुकूल वातावरण आणि हवे असलेल्या अन्नाची उपलब्धता लक्षात घेऊन हे पक्षी प्रवास करीत असतात. स्थलांतरित पक्षी हजारो किलोमीटर अंतर कापून नोव्हेंबर पासून तर डिसेंबर आणि फेब्रुवारी महिन्यापर्यंत या पक्ष्यांचा मुक्काम असतो. तर वसंत पंचमीपासून या परदेशी पाहुण्यांच्या परतीचा प्रवास सुरू होतो.

या पक्ष्यांचे होते आगमन

येथे येणाऱ्या स्थलांतरित पक्ष्यांमध्ये पिटलेस,कॉमन पोचाई,व्हाइट आय पोचाई,युरेशियन विजन, मलाई गार्गणी,कॉब डक,ग्रेलॉक गुरज,रेड क्रेस्टेड पोचाई,मलाई,गर्गनी,आक्टिंक टर्न,सायबेरियन स्टॉर्क, ब्लॅक टेलेड गॉडविट, कॉमन डिल,सायबेरियन क्रेन, नॉर्दर्न पिनटेल, ओपन बिल स्टॉर्क ब्लॅक हेड, ब्लॅक हेड एम्बिस, पांढरा स्तन, पट्टे स्टार्क, कार्पोरेट, पॅरामपल मोहॅन, मार्स हेरियर, युरशियन कलू, लिटिल स्टिंट, वॉटरहेन, राखाडी बगळा, कमी पंख असलेला गरुड यांचा समावेश असतो,या देशातून येतात हे पक्षी जिल्ह्यात नोव्हेंबर महिन्यापासून विदेशी पक्ष्यांच्या आगमनास सुरुवात होते. यानंतर फेब्रुवारी महिन्यापर्यंत या पक्ष्यांचा जिल्ह्यात मुक्काम असतो. हे पक्षी युरोपीयन देश तसेच मंगोलिया, सायबेरिया आणि हिमालयाच्या दिशेकडून दाखल होतात. जवळपास चार महिने या पक्ष्यांचा मुक्काम जिल्ह्यात असतो.

या पाणवठ्यांवर असतो मुक्काम

गोंदिया जिल्ह्यातील नवेगाव बांध,नागझिरा,सिरेगावबांध,भुरशीटोला,चूलबंद प्रकल्प,पुजारीटोला, बाजारटोला,परसवाडा,झिलमली,आमगाव तालुक्यातील नवतलाव,महादेव टेकडीपरिसर, झालिया तलाव आणि अंजोरा तलाव परिसरात परदेशी पक्ष्यांचा मुक्काम असतो.

"विदेशी पक्ष्यांसाठी नोव्हेंबर ते फेब्रवारी महिन्यापर्यंतचा कालावधी अनुकूल असतो. युरोपीयन देश तसेच मंगोलिया, सायबेरिया या देशात या कालावधीत थंडी अधिक असते, तर त्या तुलनेत या आपल्या भागात थंडी कमी असते. शिवाय जलाशयांमध्ये पक्ष्यांचे आवडते खाद्य मिळत असल्याने या परिसरात विदेशी पक्ष्यांचे मोठ्या प्रमाणात आगमन होते. सध्या विदेशी पक्ष्यांच्या आगमनाला सुरुवात आली आहे." **प्रा. शरद मेश्राम, पक्षी निरीक्षक तथा अभ्यासक, नवेगाव बांध.**

पुर्व विदर्भातील धान उत्पादक आर्थिक कोंडीत

गोंदिया–पूर्व विदर्भातील ३५ हजार शेतकऱ्यांचे २८४ कोटींची धान विक्रीची रक्कम शासनाकडे रखडल्याने धान उत्पादक शेतकरी ऐन रब्बी हंगामात आर्थिक कोंडीत सापडला आहे.शासकीय हमी भाव केंद्रांवर विक्री केलेल्या धानाची रक्कम तत्काळ देण्याची मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

पुर्व विदर्भाला धानाचे कोठार म्हणून संबोधले जाते. येथे खरीप व उन्हाळी हंगामात शेतकरी धानाचे उत्पादन घेततात. केंद्र शासनाच्या हमीभाव योजनेअंर्गत महाराष्ट्र स्टेट को–ऑपरेटिव्ह फफ्रेडरेशन व आदिवासी विकास महामंडळ अधिकृत उपअभिकर्ता संस्थांच्या माध्यमाने शेतकऱ्यांकडून धानाची हमी दरात खरेदी करतात. पूर्व विदर्भातील गोंदियासह भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली व नागपूर जिल्ह्यात जिल्हा पणन कार्यालय व आदिवासी भागात आदिवासी विकास महामंडळाच्या उपअभिकर्ता संस्था धान खरेदी करतात. खरेदीची प्रक्रीया आभासी आहे.

यासाठी शासनाने पोर्टल कार्यान्वित केले आहे. हे पोर्टल अपडेट न झाल्याने शेतकऱ्यांचे चुकारे प्रलंबित असल्याचे सांगीतले जाते. आतापर्यंत वरील पाचही जिल्ह्यांत ३५ हजार शेतकऱ्यांनी १२ लाख क्विंटल धानाची विक्री केली आहे. या धानाची किंमत २८४ कोटी रुपये सांगीतली जाते. धान खरेदी केंद्र सुरू होऊन महिनाभराचा कालावधी लोटला असला तरी धानाची रक्कम न मिळाल्याने शेतकरी आर्थिक कोंडीत सापडला आहे.आता नवीन सरकारने कारभार सांभाळा आहे. शेतकऱ्यांच्या प्रश्नाकडे लक्ष देवून धानाची रक्कम तत्काळ मिळेल या अपेक्षेत धान उत्पादक आहेत.

पूर्व विदर्भातील गोंदिया जिल्ह्यात ५ लाख ५३ हजार ५९७ क्विंटल धान खरेदी झाली असून १२७ कोटी ३२ लाख रुपये थकीत आहेत. भंडारा जिल्हत ६ लाख १५ हजार ८१० क्विंटल धान खरेदी झाली असून १४१ कोटी ६३ लाख रुपये, गडचिरोलीत ११ कोटी ८६ लाख रुपयाचे ५१ हजार ६०२ क्विंटल धान खरेदी करण्यात आले. चंद्रपूरमध्ये ११ हजार ७६९ क्विंटल धान खरेदी झाली असून २ कोटी ७० लाख रुपये प्रलंबित आहेत. तर नागपुर जिल्ह्यात ५ हजार ५६३ क्विंटल धान खरेदी झाली असून १ कोटी २७ लाख रुपये असे ३५ हजार शेतर्क?यांचे तब्बल २८४ कोटी ८१ लाख रुपये थकीत आहेत.

पर्यटनाच्या दृष्टीने गोंदिया जिल्हा समृद्ध, पण नियोजनाचा अभाव

खेमेंद्र कटरे

गोंदिया – मागास नक्षलग्रस्त जिल्ह्यातील पर्यटनस्थळांना सुध्दा शासन दरबारी पाहिजे ते स्थान व त्या पर्यटनस्थळांची मार्किटिंग करण्यात राज्यसरकारच्या विभागासह जिल्हाप्रशासनला अपयश आले.आज कोकणालाही लाजवेल अशा वनवैभव आणि अनेक अशी दुर्लक्षित स्थळे असूनही पर्यटन जिल्ह्यांच्या यादीत गोंदियाचा समावेश नाही.नव्याने तयार झालेल्या नवेगाव न्यु नागझिरा व्याघ्रप्रकल्पाला पाहिजे तशी प्रसध्दी अद्यापही न मिळाल्याने पर्यटक ताडोबा व कान्हाकेसरीकडेच जातांना दिसून येतो. जिल्ह्यातील पर्यटनस्थळाकडे बघितल्यास सांस्कृतिक आणि सामाजिक एकतेसोबतच निसर्गरम्य पर्यटनाचा आस्वाद या घेता येऊ शकतो.विशेष म्हणजे मोठ मोठी उद्योजक मंडळी गोंदियाच्याच विमानतळावर खासगी विमानाने येऊन कान्हा केसरीला जातात.परंतु त्या उद्योजक पर्यटकांना आपण आपल्या नागझिरा,गोठणगावकडे वळवू शकलो नाही.

काही वर्षांपूर्वी नवेगावबांध येथील राष्ट्रीय उद्यानातील प्राणीसंग्रहालय वन्यजीव विभागाची व पर्यावरण मंत्रालयाची परवानगी नसल्याने मोडकळीस आल्यानंतर तेथील पर्यटकांचा ओघही कमी झालेला आहे.हिवाळ्यात या ठिकाणी स्थलांतरित पक्ष्यांची गदी असते. युरोपियन डक, पीनटेक, ब्राम्हणी डक, कॉमन कुट, शेकाव्या गार्गनी, गडनाल, मलार्ड, स्पारव्हिल डक, कॉमन टील, रेडकेस्टेड, पोचार्ड, टफडेल डक, ग्रेलॅज गूज या पक्ष्यांचे थवेच्या थवे येतात. विदर्भातील पक्षीमित्रांसाठी ही पर्वणी असते. त्यांचा प्रयत्नही असतो, मात्र प्रवाशांसाठी कुठलीही सोय नसल्याने पर्यटक येण्यासाठी टाळतात. यात मात्र नुकसान होत आहे हे जिल्ह्याचेच. नागझिरा व नवेगावबांध ही स्थळे वन्यजीव व वनविभागाच्या अधीन आहेत. जोपर्यंत हे दोन्ही विभाग यासंदर्भात पुढाकार घेत नाही तोपर्यंत जिल्ह्याला लाभ मिळणार नाही. यासाठी या विभागाने पुढाकार घेण्याची गरज आहे.

जिल्ह्यात पर्यटन व्यवसायाला चांगली संधी असून नैसर्गिक,इतिहासीक स्थळांचा जिल्हा आहे.या जिल्ह्यात ६० च्या जवळपास चांगले स्थळ पर्यटनासाठी उपयुक्त आहेत..त्यापैकी २८ जागांवर पर्यटक आजही येत आहेत.त्या जागांवर पर्यटक सुविधा वाढविण्याच्या दृष्टीने २०१३ मध्ये तयार केलेल्या एका प्रोजेक्टनुसार ९४२२.६ लाख रुपयाचे नियोजन प्रस्तावित करण्यात आले होते.त्यातच २०३३ मध्ये २३ लाख पर्यटक या स्थानावर येतील आणि त्याम ाध्यमातून १ लाख १५ रोजगार २० पर्यटकामागे १ व्यक्ती पकडून लक्ष ठेवण्यात आले होते.त्या प्रोजेक्टनुसार १० वर्ष तर निघाले आहेत,मात्र त्याची साधी अमलबजावणी सुध्दा झालेली नाही.

जिल्ह्याला नैसर्गिक समृध्दीचा वारसा लाभल्याने जिल्ह्यात नागझिरा अभयारण्य व नवेगावबांध राष्ट्रीय उद्यान यांसारखे प्रकल्प तयार करण्यात आले. त्यामुळे नैसर्गिक पर्यटनाचा आनंद लुटण्यासाठी दरवर्षी हजारोच्या संख्येने पर्यटक जिल्ह्यात येत असतात. गोंदिया जिल्हा पर्यटनाच्या दृष्टीने समृद्ध असल्याचे दिसत आहे. शासनाने जिल्ह्यात पर्यटनाला चालना दिल्यास नैसर्गिक साधनातूनच जिल्ह्याचा विकास व रोजगाराच्या समस्या मागी लागेल हे निश्चित.गोंदिया जिल्ह्याला निसर्गाचं लेणं लाभलेलं आहे. आजघडीला जवळपास ३० टक्के क्षेत्र हे वनांनी आच्छादीत आहे. जिल्ह्यात नवेगावबांध राष्ट्रीय उद्यान व नागझिरा व्याघ्र प्रकल्प,हॉजराफॉल, बोदलकसा,इटियाडोह,तिबेटीयन कॅम्प,कचारगड गुफा यांसारखे पर्यटनाचे चांगले स्थळ असल्याने येथे दरवर्षी हजारो पर्यटक येत असतात. नैसर्गिक पर्यटनाचा व वन्यजीव बघण्याचा आनंद लुटण्यासाठी येणाऱ्या पर्यटकांची संख्या सातत्याने वाढतच आहे.

पर्यटकांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात महसूल मिळूनही शासन जिल्ह्याचे पर्यटन धोरण राबविण्यास अपयशी ठरत आहे. शासनाने येथील नैसर्गिकतेचा वापर पर्यटनाच्या दृष्टीने केल्यास जिल्ह्याच्या विकासासोबत रोजगाराची समस्या देखील मागी लागू शकते.

सालेकसा या नक्षलग्रस्त व आदिवासी तालुक्याला लाभलेले वनवैभव आणि सांस्कृतिक वारसासोबतच पर्यटनस्थळामुळे या तालुक्याचे नाव शेजारील राज्यातच नव्हे तर विदेशापर्यंत पोचले आहे.परंतु दरेकसा जवळील आदिवासी समाजाचे श्रद्धास्थान असलेल्या कचारगड गुफेकडे झालेल्या दुर्लक्षामुळे हे स्थळ विकसीत होऊ शकले नाही.याउलट पर्यटनस्थळाच्या विकासाच्या नावावर आजपर्यंत कितीकरी कोट्यावधीचा निधी खर्च झाला मात्र विकास सोयी सुविधांचा अभाव व गुहेतील स्वच्छतेकडे असलेल्या दुर्लक्षामुळे हे पर्यटनस्थळ फक्त फेबुवारीत ४ दिवसाकरीताच महत्वाचे ठरते.

गुहेच्या शेजारी एमटीडीसी किंवा वन्यजीव विभागाने छोटेखानी आदिवासी समाजाचे सांस्कृतिक मार्गदर्शन केंद्र व उपहारगृह उभारल्यास,देशातील कोपर्यातून येणार्या आदिवासी बांधवाना चांगला लाभ होऊ शकतो. कोट्यावधीचा निधी जरी या स्थळाकडे जाण्यासाठी खर्च झाला असला तरी गुफेतील स्वच्छता आणि त्या गुफेच्या देखरेखीकडे सातत्य नसल्याने आशिया खंडातील ही गुफा आजच्या घडीला काही दिवस वगळल्यास अस्वच्छतेचे माहेरघर असते.त्यामुले येथे येणारा पर्यटक हा पुन्हा येण्याची इच्छा व्यक्त करीत नाही.

याठिकाणी तज्ञ गाईड. आणि केंद्र पर्यटन विभागाने न सुरु केल्याने त्याचाही फटका बसतो.याठिकाणी रोपवेसह अनेक सुविधांच्या माध्यमातून पर्यटकांना पर्यटनाची संधी आहे.हॉजराफॉल हे पर्यटन स्थळ हंगामी स्वरुपात असून याठिकाणी काही प्रमाणात स्थानिक वनव्यवस्थापन समितीच्यामाध्यमातून पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी सुविधा उभारल्या गेल्या आहेत.या भागात रात्रीच्या पर्यटनाला संधी आहे,त्याकडे जिल्हा प्रशासनाने केलेला दुर्लक्ष आणि नक्षलवाद्याच्या नावावर दाखविण्यात येणारी भिती ही या पर्यटनस्थळाच्या विकासाला बाधा ठरली आहे.

संपादकीय

दिल्लीच्या वेशीवर पुन्हा शेतकरी आंदोलन

केंद्र सरकारकडून पिकांना कायदेशीर हमी आणि किमान आधारभूत किमतीच्या अंमलबजावणीसह अन्य मागण्यांसाठी गेले ९ महिने आंदोलन करणाऱ्या शेतकऱ्यांनी पंजाब-हरियाणा सीमेवरील शंभूपासून राजधानी दिल्लीकडे कूच केली आहे. कायदा आणि सुव्यवस्था राखण्याच्या दृष्टीने हरियाणा सुरक्षा दलाने शेतकऱ्यांचा मोर्चा शुक्रवारी शंभू सीमेवर अडवून अश्रुधुराचा मारा केला. यामध्ये आठ शेतकरी जखमी झाले. त्यानंतर हा मोर्चा दिवसभरासाठी स्थगित केला.सोमवारी आंदोलनाची पुढील दिशा ठरवली जाणार आहे. सुरक्षा दलांनी दिल्लीकडे निघालेला शेतकऱ्यांचा मोर्चा १३ फ्फ्रेब्रुवारीला रोखल्यापासून शेतकरी पंजाब आणि हरियाणामधील शंभू आणि खनौरी सीमेवर तळ ठोकून आहेत. आंदोलक शेतकऱ्यांची संख्या १० हजारांच्यावर असल्याने त्यांना रोखण्यासाठी दोन्ही सीमेवर निमलष्करी दलाच्या अनेक तुकड्या तैनात करण्यात आल्या आहेत.दोन वर्षांपूर्वी, शेतकरी उत्पादने व्यापार व वाणिज्य (प्रोत्साहन व सुविधा) कायदा २०२०, शेतकरी (सशक्तीकरण आणि संरक्षण) किंमत आश्वासन आणि कृषी सेवा करार कायदा २०२० आणि अत्यावश्यक वस्तू (दुरुस्ती) कायदा २०२० हे कायदे रद्द करण्यासाठी दिल्लीच्या सीमेवर मोठे आंदोलन करण्यात आले. या कायद्यांच्या माध्यमातून काही निवडक शेती मालाला मिळणारा किमान हमी भाव देण्याचा नियम रद्द करू शकते, अशी भीती शेतकऱ्यांना होती. शेतीचे खासगीकरण होण्याचीही शेतकऱ्यांना भीती होती. कारण त्यानंतर त्यांना काही कंपन्यांवर अवलंबून राहावे लागणार होते. त्यावेळच्या देशव्यापी आंदोलनानंतर मोदी सरकारने दोन पावले मागे येत तिन्ही कृषी कायदे रद्द केले. मात्र पुन्हा शेतकरी आंदोलन पेटले आहे. इतर मागण्या मान्य झाल्या नाहीत, असे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. किमान आधारभूत किमतीच्या (एमएसपी) अंमलबजावणीसह शेतकरी कर्जमाफी, शेतमजुरांसाठी पेन्शन, वीज दरात वाढ करू नये, आंदोलनादरम्यान दाखल करण्यात आलेले गुन्हे मागे घेणे आणि २०२१ मधील लखीमपूर खेरी हिंसाचारातील पीडितांना न्याय द्यावा, अशा अन्य मागण्या आहेत.

आम्ही नव्या मागण्यांसाठी दिल्ली चलोची घोषणा दिलेली नाही. शेतकरी आंदोलन मागे घेताना सरकारने दोन वर्षांपूर्वी दिलेली आश्वासने पूर्ण करावी, अशी आमची मागणी आहे. सरकारने त्यावेळी किमान हमीभावाचे आश्वासन दिले होते. त्याचबरोबर शेतकरी आंदोलनावेळी शेतकऱ्यांवर केलेले गुन्हे मागे घेतले जातील,असेही म्हटले होते. लखीम पूर-खिरीच्या घटनेतील मृतांच्या कुटुंबीयांना नोकरी आणि जखमींना प्रत्येकी दहा लाख देणार असल्याचे सरकारने म्हटले होते. शेतकऱ्यांना प्रदूषण कायद्यापासून दूर ठेवले जाईल. शिवाय सर्वांत मोठे आश्वासन म्हणजे शेतक?यांना स्वामिनाथन आयोगाच्या शिफारसींनुसार शेतमालाला भाव दिला जाईल, असे म्हटले होते. यातील कोणतेही आश्वासन पूर्ण झाले नाही, असे शेतकरी नेत्यांचे म्हणणे आहे.शेतकऱ्यांचे आंदोलन अनेक महिने सुरू असले तरी केंद्र सरकारने त्याची वेळोवेळी दखल घेतली आहे. चर्चेतून मार्ग सोडवावा, यासाठी मोदी सरकार प्रयत्नशील आहे. त्याचवेळी विरोधी पक्षांकडून राजकारण करून आंदोलकांना भडकावण्याचा प्रयत्न सुरू आहे. डीएमके खासदार कनिमोझी करुणानिधी यांनी दिल्ली चलो मोर्चा दरम्यान शेतकऱ्यांवरील पोलीस कारवाईचा निषेध करताना बळाचा अमानुष वापर केल्याचे म्हटले आहे. केंद्र सरकारने तत्काळ शेतकरी प्रतिनिधींशी संपर्क साधावा आणि विलंब न लावता त्यांच्या मागण्यांकडे लक्ष द्यावे असे आवाहन केले. शेतकरी नेते सर्वनसिंह पंढेर यांचा तक्रारीचा सूर कायम आहे. केंद्र सरकार शेतकऱ्यांशी चर्चा करण्याच्या मनस्थितीत नाही. त्यांच्या बाजूने शांततेने प्रश्न सोडवण्यासाठी कोणताही सकारात्मक पुढाकार आम्हाला दिसत नाही. पोलिसांसोबतच्या चकमकीमध्ये अनेक शेतकरी जखमी झालेत. काहींची प्रकृती गंभीर आहे. तरीही सरकारची दडपशाही सुरू आहे, असे त्यांचे म्हणणे आहे.शेतकऱ्यांचा निषेध मोर्चा दिल्लीकडे कूच करत असतानाही कृषी मंत्री त्यांना एमएसपीवर पिकांची खरेदी करण्याचे आश्वासन देत आहेत.

शेतकऱ्यांना जाचक म्हणून केंद्र सरकार तीन कृषी कायदे मागे घेऊ शकते. मग अन्य आश्वासनेही पूर्ण करेल. मात्र सरकारला थोडा वेळ द्यायला हवा. आंदोलक शेतकऱ्यानी टोकाची भूमिका न घेता मोदी सरकारवर विश्वास दाखवायला हवा. त्यांनी आंदोलन अधिक तीव्र न करता चर्चेच्या माध्यमातून मागण्या पूर्ण करून घ्याव्यात. सरकारने चर्चेची तयारी ठेवली असताना दिल्लीकडे कूच करण्याऐवजी त्यांना प्रतिसाद द्यावा, अशीच सर्वांची अपेक्षा आहे.

देवेंद्र ०३ पर्वाचा, राज्यात शुभारंभ!

महाराष्ट्र राज्याच्या मुख्यमंत्रीपदी अपेक्षेप्रमाणे देवेंद्र फडणवीस यांची निवड झाली. भाजपाकडून सर्वप्रथम मुख्यमंत्रीपदावर देवेंद्र फडणवीस यांचाच हक्क होता. गेल्या काही वर्षांपासून महाराष्ट्रात भाजपाचे नेतृत्व म्हणून देवेंद्र फडणवीस यांच्या कर्तृत्वावर महाराष्ट्रातील जनतेने शिक्कामोर्तब केले आहे. भाजपामध्ये महाराष्ट्रात अनेक नेते आहेत, पण ते त्या त्या जातीपुरते, समाजापुरते,भागापुरते,मतदारसंघापुरते मर्यादित असलेले नेते आहेत. देवेंद्र फडणवीस यांनी एकदा नव्हे तर अनेकदा भाजपा पक्षसंघटना बांधणीच्या निमित्ताने, मुख्यमंत्री म्हणून राज्य कारभार सांभाळण्याच्या माध्यमातून अनेकदा महाराष्ट्र पिंजून काढला आहे. देवेंद्र फडणवीस यांचा जीवनपट संघर्षातूनच उभारी घेतलेला आहे. आरएसएसचा एक मर्यादाशील, संयमशील, विनयशील, बुद्धिवान व प्रामाणिक व्यक्तिमत्त्व असलेला कार्यकर्ता अशी देवेंद्र फडणवीस यांचा संघ परिवारात गेल्या अनेक वर्षांपासून परिचय आहे. भाजपामध्ये गोपीनाथ मुंडे हे जसे तळागाळातून सर्वोच्च स्थानी विराजमान झालेले नेतृत्व होते, तशीच काहीशी वाटचाल ही देवेंद्र फडणवीसांची झालेली आहे. नगरसेवक, महापौर, आमदार ते मुख्यमंत्री अशी राजकीय वाटचाल फडणवीसांची राहिली असून पक्षसंघटनेतही सर्वसामान्य कार्यकर्ता ते प्रदेश अध्यक्ष अशी वाटचाल फडणवीस यांनी केलेली आहे. ऑक्टोबर १९९९ साली झालेल्या महाराष्ट्र राज्याच्या विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीत आमदार म्हणून सर्वप्रथम निवडून आले आहेत. त्यानंतर सलग सहा वेळा ते आमदार म्हणून सभागृहात आले आहेत. आमदार, गटनेता, विरोधी पक्षनेता, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री अशी त्यांची वाटचाल राहिलेली आहे.महाराष्ट्र राज्याचे ते २१ वे मुख्यमंत्री म्हणून विराजमान झाले असले तरी फ्फ्रारच कमी मुख्यमंत्र्यांना पूर्ण पाच वर्षे राज्याचे मुख्यमंत्रीपदाची धुरा सांभाळण्यास मिळालेली आहेत. त्यामध्ये देवेंद्र फडणवीस यांचा नंबर लागतो. एक कडवट हिंदुत्ववादी अशी त्यांची प्रतिमा असून काळ अनुकूल असो वा प्रतिकूल, सत्तेसाठी, पदासाठी त्यांनी कधीही हिंदुत्वाशी तडजोड न केल्याने एक हिंदू नेता अशी राज्यात त्यांची प्रतिमा आहे. सहा वेळा आमदार बनलेले देवेंद्र फडणवीस तिसऱ्यांदा राज्याचे मुख्यमंत्री बनले.शपथविधी घेताच कोणत्याही प्रकारचा जल्लोष साजरा न करता अवघ्या तासाभरात मंत्रिमंडळाची बैठक घेत आपले सरकार हे आगामी पाच वर्षांत केवळ कागदोपत्रीच नाही तर प्रत्यक्षातही गतीमान सरकार राहणार असल्याचे संकेत फडणवीस यांनी दिले.

EVM,संशय,निवडणूक व निवडणूक आयोग

नुकतेच महाराष्ट्र राज्य व झारखंड राज्य येथे विधानसभासाठी मतदान होऊन निकाल लागला. त्यात महाराष्ट्र राज्यात महायुतीला बहुमत मिळाले तर झारखंड मध्ये महाविकास आघाडीला मिळाले. पण ज्या पक्षाला बहुमत मिळाले नाही किंवा ज्या पक्षाच्या अपेक्षेप्रमाणे जागा निवडून आल्या नाही असे पक्ष मतदान यंत्रावर प्रश्नचिन्ह निर्माण करून मतदान पत्रिकेच्या माध्यमातून निवडणूक व्हावे यासाठी प्रयत्न करणार आहेत.

सदर बाब नवीन नसून जेव्हापासून मतदान यंत्राचा वापर मतदान प्रक्रियेमध्ये होत आहे तेव्हापासून ज्या पक्षाला बहुमत मिळाले नाही किंवा त्यांच्या अपेक्षेप्रमाणे जागा आल्या नाही असे पक्ष मतदान यंत्रावर संशय निर्माण करत असतात

भारत स्वतंत्र झाल्यानंतर २६ नोव्हेंबर १९४९ रोजी संविधान तयार करून देशाला अर्पण करण्यात आले. २६ जानेवारी १९५० रोजी संविधानाची अमलबजावणी झाली. भारतीय संविधानाच्या प्रथम अनुछेदात भारताचे वर्णन हे भारत राज्याच्या संघ असेल असे करण्यात आले.. भारतीय संविधानानुसार भारताने लोकशाही तंत्राचा स्वीकार केला. तेव्हा भारतामध्ये निवडणूक होण्यासंदर्भात संविधानाच्या भाग १५ कलम ३२४ अन्वये भारतीय निवडणूक आयोगाची निर्मिती २५ जानेवारी १९५० रोजी करण्यात आली. भारतीय निवडणूक आयोग हे स्वायत्त्य संस्था आहे. निवडणूक आयोगाला भारतीय संविधानाच्या चार स्तंभा पैकी एक मानले जाते.

निवडणूक आयोगामध्ये मुख्य निवडणूक आयुक्त. राष्ट्रपती नेमतील इतके अन्य निवडणूक आयुक्त यांच्यासह निवडणूक आयोग बनतो. केंद्र शासन निगडीत निवडणूक घेण्यासंदर्भात केंद्रीय निवडणूक आयोग काम पाहतो. व राज्य शासन निगडीत निवडणूक घेण्यासंदर्भात राज्य निवडणूक आयोग कारभार पाहतो. निवडणूक आयोग मतदारसंघाची आखणी करणे, मतदार यादी तयार करणे, राजकीय पक्षांना मान्यता देणे व निवडणूक चिन्ह ठरविणे, अपक्ष उमेदवाराला चिन्ह देणे,आचार संहिता लावणे,उमेदवार पत्रिका तपासणे, उमेदवाराच्या निवडणूक खर्चाला ताळमेळ लावणे इत्यादी कामे करीत असतात.

भारत स्वातंत्र्य झाल्याच्या नंतर २५ ऑक्टोबर १९५१ ते २१ फेब्रुवारी १९५२ पर्यंत पहिला लोकसभेच्या निवडणूक घेण्यात आला. त्यात लोकसभेमध्ये ४८९ खासदार निवडून गेले.. सदर निवडणुकीत मतदान पत्रिकेचा वापर करण्यात आले.

त्यानंतर अनेक निवडणुका सुद्धा मतदान पत्रिकेचा वापर करून होऊ लागल्या पण मतदान पत्रिकासंबंधी उद्भवत असलेल्या काही अडचणींवर मात करण्यासाठी व मतदारांना आपले मत योग्यरित्या व कोणतीही संदिग्धता न राहता देता यावे, तसेच मते बाद होण्याची शक्यता राहू नये या उद्देशाने आयोगाने सन १९७७ मध्ये नवीन तंत्रज्ञानाचा लाभ घेऊन इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांचा वापर करण्याची कल्पना मांडली. संसदेने यासाठी लोकप्रतिनिधीत्व कायदा अधिनियम, १९५१मध्ये १९८८ साली सुधारणा केली व कलम ६१ (अ) हे नवीन कलम त्यात घातले. त्या कलमानुसार निवडणूक आयोगाला मतदान यंत्रे वापरण्याचे अधिकार प्राप्त झाले. हे कलम १९८९ पासून अंमलात आले.केंद्र सरकारने जानेवारी १९९० मध्ये निवडणूक सुधारणा समितीची नेमणूक केली. त्या समितीत मान्यता प्राप्त राष्ट्रीय व राज्यस्तरीय राजकीय पक्षांचे प्रतिनिधी होते. त्या समितीमध्ये इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांच्या कामाचे मूल्यमापन करण्यासाठी तंत्रज्ञान कुशल व्यक्तींची एक समिती होती.

ही समिती अशा निर्णयाप्रत आली की, इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे सुरक्षित आहेत. त्यामुळे एप्रिल १९९० मध्ये या समितीने एकमताने अशी शिफारस केली की, यापुढे वेळ न दवडता इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांचा वापर सुरु करावा सन २००० सालापासून १०७ विधानसभा निवडणूकांत, ३ लोकसभा निवडणूकांत (२००४, २००९ व २०१४) इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांचा वापर केला गेला आहे.

२००१ सालापासून इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रात अनधिकृतरित्या फेरबदल केले असल्याचा विषय विविध उच्च न्यायालयांसमोर उपस्थित केला गेला,मा. मद्रास उच्च न्यायालय २००१,मा. दिल्ली उच्च न्यायालय - २००४,मा. कर्नाटक उच्च न्यायालय २००४,मा. केरळ उच्च न्यायालय २००२,मा. मुंबई उच्च न्यायालय नागपूर - २००४ या सर्व उच्च न्यायालयांनी इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांचा वापर करण्यामध्ये उद्भवत असलेल्या सर्व तांत्रिक व प्रशासकीय बाबींचा सविस्तर विचार केला व असा निर्णय दिला की, भारतात वापरली जाणारी इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे विश्वासार्ह, भरवशाची व अनधिकृतपणे फेरफार करण्यापासून पूर्णपणे सुरक्षित अशी आहेत.

काही बाबतीत उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाविरुद्ध दाखल केलेली अपील सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली आहेत. तरीही आज जो पक्ष निवडणूक हारतो किंवा त्याच्या मनासारख्या जागा निवडून न आल्यास तो पक्ष इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रावर संशय निर्माण करतो. अशा वेळेस निवडणूक आयोगाने सदर पक्षाला बोलावून इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रावरील संशय दूर करण्याच्या प्रयत्न केला पाहिजे. त्यांनी केलेल्या संशयात काही तथ्य न आढळल्यास इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रावर अविश्वास निर्माण होणाऱ्या अफवावर बंदी घालण्याची तंबी सदर पक्षाला दिली पाहिजे.

तसेच इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रावर पक्षांचा व लोकांचा विश्वास निर्माण होण्यासाठी ज्या दिवशी मतदान प्रक्रिया होते त्याच दिवशी प्रत्येक बुथवर मतदान संपल्याच्या नंतर मतमोजणी करावे, प्रत्येक बूथ इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र व मत पत्रिका या दोन्ही बाबी उपलब्ध ठेवावे. जेणे करून मतदार आपल्याला आवडीने दोन पैकी एकाचा वापर करून मतदान करू शकेल,

रविंद्रकुमार अंबुले,गोंदिया

गोंदिया आगाराच्या भंगार बसेस धावतात रस्त्यावर!

गोंदिया : - राज्य परिवहन महामंडळाच्या एस टी बसमधून प्रवास करणे आता धोक्यापासून मुक्त होताना दिसत नाही. एसटी बसेस मार्गावर कुठेही बिघाड होणे हे आता जणू काही दररोजचेच झाले आहे. कोहमारा-गोंदिया मार्गावरील खजरी डव्वा गावाजवळ २९ नोव्हेंबर रोजी एसटी शिवशाही बसच्या अपघातात ११ प्रवाशांचा मृत्यू झाल्यानंतर हा मुद्दा पुन्हा चर्चेत आला आहे.सर्वसामान्य नागरिकांना स्वस्त आणि सुरक्षित वाहतुकीची हमी देणाऱ्या एसटी ची बसेस भंगार अवस्थेत असल्या, तर सुरक्षित प्रवासाची हमी कोण देणार? असा प्रश्न या निमित्ताने आता उपस्थित होत आहे.गोंदिया आगारात सध्या एकूण ७० प्रवासी बसेस आहेत. त्यापैकी १३ बसेस २०२५ मध्ये त्यांच्या सेवेची १५ वर्षे पूर्ण करतील. म्हणजेच ते भंगारासाठी योग्य होईल. तर गेल्या ५ वर्षांपासून गोंदिया आगाराला एकही नवीन बस मिळालेली नाही.

अशा स्थितीत जुन्या बसेसनेच वाहतूक चालवावी लागत असून कर्मचाऱ्यांची ही मोठी कमतरता आहे.गोंदिया आगारात चालक व वाहकांची एकूण २४८ पदे मंजूर आहेत.मात्र सध्या केवळ २०५ कर्मचारी कर्तव्यावर आहेत. यामध्ये ८३ चालक, ६२ वाहक आणि ५९ चालक सह वाहक आहेत. आगारातून बाहेर पडण्यापूर्वी एसटी बसेसची नियमानुसार कसून तपासणी केली जाते.मात्र गोंदिया आगारात यांत्रिकी (मेकॅनिक) कर्मचाऱ्यांचीही कमतरता आहे. त्यात ही यांत्रिकी महिला कर्मचारी रात्री ड्युटीवर नसतात. तर बहुतांश बसेस आपला दिवसभरचा प्रवास पूर्ण करून रात्रीच्या वेळीच आगारात येतात. अशा स्थितीत पुरेशा प्रमाणात देखभाल दुरुस्ती अभावी सातत्याने बसेसमध्ये बिघाड होतच असतात.काही प्रसंगी तर एसटी बसेसची अवस्था बिकट झाल्याने त्या वेळेवर रद्द ही केल्या जातात.

बस ३ किमी प्रवास केल्यानंतर झाली निकामी

४ डिसेंबर रोजी गोंदियाहून सालेकसा मार्गे आमगावकडे जाणारी बस क्र. एम.एच.०७/सी -९४५३ ही डेपोपासून गोंदिया शहरातील जयस्तंभपर्यंत जेमतेम तीन किलोमीटरवर पोहोचली आणि निकामी झाली. तोपर्यंत वाहकाने अनेक प्रवाशांची तिकिटे ही कापली होती. ही बस नंतर पुन्हा आगारात नेण्यात आली आणि ज्या प्रवाशांनी तिकीट काढले होते त्यांनाही खाली उतरवण्यात आले. नंतर कळलं की दुसरी बसची व्यवस्था करण्यात आली आहे. यापूर्वी ३ डिसेंबर रोजी गोंदिया हून सालेकसा मार्गे आमगावकडे जाणारी बस क्र.एम.एच.४०/एन -८७०५ ही खमारी गावाजवळ आली असता निकामी झाली असता प्रवाशांना तिथच उतरवून एका तासानंतर पाठीमागून येणाऱ्या बस मध्ये व्यवस्था करण्यात आली. दरम्यान प्रवाशांना झालेल्या त्रासाबद्दल कोणालाही घेणे देणे नाही.

दररोज १८ हजार प्रवासी करतात प्रवास

गोंदिया आगाराच्या बसेसच्या दररोज ३७५ फेऱ्यांचे नियोजन करण्यात आले आहे. त्यापैकी ३३६ ते ३४० फेऱ्या दररोज चालतात. आगाराला प्रवाशांकडून दररोज ८ ते १० लाख रुपयांचे उत्पन्न मिळते. मात्र प्रवाशांच्या सुरक्षेकडे लक्ष दिले जात नसल्याचे दिसून येत आहे. महामंडळाच्या बसेसमध्ये प्रथमोपचार पेटी असणे आवश्यक आहे, जेणेकरून कोणतीही दुर्घटना घडल्यास प्रवाशांना प्रथमोपचार करता येईल. त्याचप्रमाणे वाहनांमध्येही अग्निशमन यंत्रे असणे आवश्यक आहे. मात्र येथे सुविधा तर दूरच, प्रवासी उपयोग करतात त्या सीट ही फाटलेल्या असतात. आरटीओच्या नियमानुसार बसमध्ये प्रवाशांना बसता येते आणि जास्तीत जास्त १० प्रवासी उभे राहू शकतात. मात्र प्रत्यक्ष पाहिल्यास बसेस प्रवाशांनी खचाखच भरलेल्या दिसून येतात.

टीबी मुक्त भारत कार्यक्रमांतर्गत रुग्णशोध मोहिमेचे उदघाटन

गोंदिया- सार्वजनिक आरोग्य विभाग गोंदिया व जिल्हा क्षयरोग केंद्र यांच्या एकत्रित सहाय्याने के.टि.एस. शासकिय रुग्णालय येथील जिल्हा क्षयरोग केंद्रासमोरील भागात जिल्हास्तरीय शंभर दिवसीय टीबी मुक्त भारत कार्यक्रम अंतर्गत रुग्णशोध मोहिमेचे उद्घाटन संपन्न झाले.जिल्हाधिकारी प्रजित नायर,जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी एम.मुरुगानंथम,जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.अमरिश मोहबे,जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.नितीन वानखेडे यांच्या मार्गदर्शनीय शंभर दिवसीय टीबी रुग्णशोध मोहीमेचे उद्घाटन अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.तृप्ती कटरे,सहाय्यक जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.अरविंदकुमार वाघमारे,जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ.अभिजीत गोल्हार यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. यावेळेस सर्वात प्रथम टिबी मायक्रोबॅक्टेरीयम जंतुचे शोध जनक डॉ.रॉबर्ट कॉक यांच्या प्रतिमेला माल्यार्पण व पुजन करुन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.ह्यावेळी मान्यवरांच्या हस्ते १०० दिवस मोहिमेदरम्यान करण्यात येणारे एक्स-रे व्हॅनला हिरवी झेंडी देवुन उद्घाटन सुद्धा करण्यात आले. जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ.अभिजीत गोल्हार यांनी कार्यक्रमाचे प्रास्तविक केले.कार्यक्रमाच्या शेवटी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते क्षय रुग्णांना फ्फ्रूड बास्केट चे वितरण करण्यात आले.तसेच जिल्ह्यातील टिबी चॅम्पियन यांचा सत्कार करण्यात आला.

सदर कार्यक्रमाला जिल्हा साथरोग अधिकारी डॉ.निरंजन अग्रवाल,जिल्हा माध्यम व विस्तार अधिकारी विजय आखाडे, जिल्हा आयईसी अधिकारी प्रशांत खरात,जिल्हा मौखिक अधिकारी डॉ.अनिल आटे,कुष्ठरोग विभागाचे वैद्यकिय अधिकारी डॉ.भाग्यश्री गांवडे,गोंदिया तालुका आरोग्य अधिकारी डॉ.निलेश जाधव, युनायटेड हॉस्पीटलचे सर्जन तथा निक्षयं मित्र डॉ.सचिन केलंका,कुंभारे नागरी आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ.संदीप कोठारी व डॉ.शिवानी कश्रपगते, क्षयरोग केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ.वेदप्रकाश चौरागडे व डॉ.देव चांदेवार, जिल्हा पीपीएम समन्वयक प्रज्ञा कांबळे यांचेसहीत हरिष चिंधालोरे, उर्मिला बघेले,पवन वासनिक, आकाश चुंने, योगिता अडसड, रोशन भैशारे,टिबी चॅम्पियन मोहमद अख्तर तसेच आशा सेविका, गट प्रवर्तक, स्टाफ नर्स, प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी,एक्स-रे टेक्निशियन, फ्फ्रार्मासिस्ट,पीपीएसए प्रकल्प स्टॉफ मोठ्या संख्येने उपस्थित होते. सुत्रसंचालन पवन वासनिक तर आभार प्रदर्शन डॉ.वेदप्रकाश चौरागडे यांनी केले.

ग्रामपंचायत झाली कोट्यधीश

गोंदिया : ६०० कुटुंब आणि २११६ एकूण लोकसंख्या असलेले गोंदिया जिल्ह्यातील सालेकसा तालुक्यातील भजेपार ग्रामपंचायतने "माझी वसुंधरा" अभियानासह शासनाच्या विविध योजनांची एक कोटी तीन लाख रुपये पेक्षा जास्त बक्षिसे जिंकून संपूर्ण जिल्ह्यात नावलौकिक मिळवला. या करिता युवा सरपंच चंद्रकुमार बहेकार यांच्या कल्पक नेतृत्व आणि त्यांच्या खांद्याला खांदा लावून चालणारे गावातील शिक्षित युवक व गावकऱ्यांनी घेतलेल्या अविरत परिश्रमाचे हे फलित आहे.

सालेकसा तालुक्यातील वाघ नदीच्या काठावर वसलेले भजेपार हे गाव पूर्णतः शेतीवर अवलंबून असून या गावातील लोक वर्षभर आपल्या शेतात राबतात आणि अनेक कार्यक्रम गावात आयोजित करतात. या गावात कोणतेही उपक्रम राबविताना अवघे गाव एका कुटुंबासारखे एकत्रित येते. सोबतच शासनाच्या योजनांची आव्हाने स्वीकारून शेवटपर्यंत परिश्रम घेतात. दरम्यान, या गावाला एका तरुण सरपंचांचे कल्पक नेतृत्व लाभले आणि गावकऱ्यांचे परिश्रम फळाला आले आणि गाव शासनाच्या विविध योजनांचे पुरस्कार मिळवायला लागले.

तंबाखूमुळे ७५१ जणांचे तोंड उघडेना

गोंदिया : तंबाखू, सिगारेट सेवन करण्याचे प्रमाण हे दिवसेंदिवस वाढत आहे. याच्या अनेक दुष्परिणामांचा सामनाही अनेक नागरिकांना करावा लागत आहे. तंबाखूमुळे कर्करोगाचे प्रमाण हे दिवसेंदिवस वाढत आहे.जिल्ह्यात सन २०२४ च्या एप्रिल ते नोव्हेंबर या नऊ महिन्यांच्या काळात गोंदिया जिल्ह्यात तंबाखू खाणाऱ्या १९ जणांना तोंडाचा कर्करोग झाला आहे.

गोंदिया जिल्हा तंबाखू नियंत्रण कार्यक्रमाअंतर्गत एप्रिल ते नोव्हेंबर या नऊ महिन्यांत १९ जणांना तोंडाचा कर्करोग आढळला आहे. तंबाखूच्या सेवनाने अनेक दुष्परिणाम मानवी शरीरावर होत असल्याचे दिसून येत आहे. यात प्रामुख्याने तोंडाचा कर्करोग,आठांचा,जबड्यांचा,फुफ्फुसांचा,घशाचा,पोटाचा,तसेच मूत्राशयाचा कर्करोग होण्याची शक्यता अधिक असते.यामध्ये तोंडाचा कर्करोग होण्याचे प्रमाण जास्त आढळून आले आहे. त्यामुळे तंबाखू सेवनापासून नागरिकांनी दूर राहावे, यासाठी आरोग्य विभागाकडून जनजागृती केली.

१६ हजार १२१ जणांची तपासणी

जिल्हा तंबाखू नियंत्रण कार्यक्रमांतर्गत एप्रिल ते नोव्हेंबर २०२४ या नऊ महिन्यांत गोंदिया जिल्ह्यातील तंबाखू खाणाऱ्या १६ हजार १२१ जणांची तपासणी करण्यात आली आहे. त्यात १९ जणांना तोंडाचा कर्करोग आढळल्याचे पुढे आले आहे.

गुटखाबंदी कागदावरच

कॅन्सरच्या रुग्णांची वाढती संख्या लक्षात घेता, राज्यामध्ये तंबाखूजन्य पदार्थांवर बंदी घालण्यात आली आहे; परंतु आजही मोठ्या प्रमाणावर जिल्ह्यात सर्वच ठिकाणी खुलेआम गुटखा व तंबाखूजन्य पदार्थांची विक्री होत आहे. या अवैध गुटखा विक्रीवर प्रशासना- कडून कोणत्याही प्रकारची कारवाई होत नसल्याने गुटखाबंदी ही नावालाच असल्याचे चित्र आहे.

१९ जणांना तोंडाचा कर्करोग

गोंदिया जिल्हा तंबाखू नियंत्रण कार्यक्रमांतर्गत एप्रिल ते नोव्हेंबर या नऊ महिन्यांत १९ जणांना तोंडाचा कर्करोग आढळला आहे. कॅन्सरचे रुग्ण वाढत आहेत.

७५१ जणांचे तोंड उघडेना

मागील नऊ महिन्यांत तंबाखू खाणाऱ्या १६ हजार लोकांची तपासणी करण्यात आली. यात ७५१ लोकांचे तंबाखूमुळे तोंडच उघडत नव्हते. हे रुग्णदेखील कर्करोग होण्याच्या मार्गावर आहेत. तोंड न उघडणे हे कर्करोगाचे पूर्व लक्षण आहे.

महिन्यातून एकदा तपासर्णी हवीच

आपण तंबाखू, गुटखा खात असाल तर प्रत्येक महिन्याला आपली आरोग्य तपासणी करून घ्या. आपल्याला कर्करोग होण्याची दाट शक्यता आहे. त्यासाठी वेळोवेळी तपासणी केली, तर त्याचे वेळीच निदान होऊ शकते अन्यथा आपल्याला धोका उद्भवू शकतो.

"जिल्हा तंबाखू नियंत्रण कार्यक्रमांतर्गत सन २००३ कोटपा कायद्याची प्रभावी अंमलबजावणी गोंदिया जिल्ह्यात केली जाते. पानटपरीची तपासणी करून त्यांच्यावर कारवाई केली जात आहे. आता शासकीय कार्यालयातील कर्मचाऱ्यांवरही दंडात्मक कारवाई करण्यात आली." **डॉ. अनिल आटे, जिल्हा मौखिक अधिकारी,गोंदिया.**

तेली समाज आणि संताजी महाराज

गेल्या सुमारे तीस वर्षात संताजी महाराज विदर्भ तेली समाज महासंघाच्या माध्यमातून वैशिष्ट्यपूर्ण रित्या घराघरांत पोहचले. विदर्भ तेली समाज महासंघ ही एक जात संघटना असली तरी जातीव्यवस्था विरोधी भूमिका घेत समाज प्रबोधन कार्यक्रम सातत्याने राबविले. मंडल आयोग ओबीसी समाजासाठी आहे. हे तेली समाजाला समजावून सांगत तेली समाजाची शैक्षणिक,सामाजिक, आर्थिक, राजकीय, प्रशासकीय व्यावसायिक वस्तुस्थिती संदर्भासह मांडून समाजात आत्मभान निर्माण केले. अर्थात या प्रवासात जातीव्यवस्था, धर्मग्रंथांची चिकित्सा करत या देशात शुद्रातिशुद्रांच्या उत्थानासाठी हजारो वर्षे लढा देणाऱ्या प्रबोधन परंपरेचा इतिहास समाजासमोर आणला गेला. जातीवादी विषम सनातनी व्यवस्थेला नकार देत शंभुक या शुद्र तपस्वींनी ज्ञान साधना केली असता, धर्म बुडाला म्हणून सनातन्यांचा कसा कांगावा होऊन शंभुकाला शिक्षा होते.याचा मागमूस घेत चिकित्सक जातवर्णीय विश्लेषण समोर येऊ लागले. धर्मग्रंथानुसार भेदाभेद करणारी हीच परंपरा तेली समाजाची अधोगती करणारी ठरली आहे. धर्मशास्त्र स्त्रीशुद्रातिशुद्रांच्या शिक्षणावर बंदी लादते. म्हणून विद्येविना कित्येक अनर्थ झाल्याचे ऐतिहासिक सत्य समोर येत आहे. याची जाणीव तेली समाजाला करुन देत, वारकरी संप्रदायाचे,संत चळवळीचे समाजप्रबोधनाचे कार्य समोर आणण्याचे काम मोठ्या जिकिरीनं महासंघाने केले. संत तुकारामांच्या विद्रोही भूमिकेचा नविन दृष्टीने विचार समाजापर्यंत पोचवत असताना तुकारामासोबत धाकट्या बंधूसमान असलेल्या तुकारामांच्या प्रियशिष्यांचे संताजी महाराजांचे आणि डॉ. मेघनाद साहा यांचे एकत्रित तैलचित्र प्रकाशित करून कित्येक वर्षे त्याचा प्रसार केला. विदर्भ तेली समाज महासंघाच्या प्रत्येक कार्यक्रमात महात्मा शंभुक, संताजी जगनाडे महाराज आणि डॉ. मेघनाद साहा नेहमीच केंद्रस्थानी राहिले. त्यांच्या विचारातून समाज प्रबोधन होत असतानाच संताजी महाराज आणि डॉ. मेघनाद साहा यांच्या फोटोचा प्रचार सर्वत्र होत राहिला. त्या फोटोमध्ये संताजी महाराज हातात लेखणी घेऊन अभंगगाथा लिहत असल्याचे दिसते. यामागील विदर्भ तेली समाज महासंघाची भूमिका समजून घेतली पाहिजे. धर्मांधशक्तीनी वारकरी संप्रदाय आणि संतांचे ब्राम्हणीकरण करुन तो संप्रदाय आणि संत टाळकुटे म्हणून प्रक्षिप्तपणाने मांडले.

त्यांच्या जीवनाशी चमत्कारिक गोष्टी चिकटवून त्यांचे जनसुखाय सामाजिक कार्ये झाकून टाकले. त्

जादूटोण्याच्या संशयातून वृद्ध दाम्पत्यास मारहाण;चिरेखनी येथील घटना

गोंदिया : ग्रामीण भागात फफोफफावलेली अंधश्रद्धा काही केल्या कमी होताना दिसत नाही. जादूटोणा प्रकारावरून अनेक ठिकाणी शिवीगाळ, मारहाण, खून अशा घटना घडत आहेत. पोलिससुद्धा अशा प्रकरणांत गुन्हा दाखल करून मोकळे होतात, मात्र जादूटोणा कायद्यान्वये गुन्हा दाखल करून आरोपींना दंड देण्यास धजावत नाही.

त्यामुळे आरोपी आणखी उदंड होत असून, त्यांच्यात रुजलेली अंधश्रद्धेची कीड आणखी वाढतच जाते. अशीच एक भयावह घटना तालुक्यातील ग्राम चिरेखनी येथे २७ ऑक्टोबर रोजी रात्री १० वाजता घडली.

सविस्तर प्रकरण असे, ग्राम चिरेखनी येथे नामदेव मार्कंड पारधी (६५) हे पत्नी सुभद्रा व कारणबाई या दोन पत्नींसोबत राहतात. २७ ऑक्टोबर रोजी रात्री १० वाजता आरोपी मुन्ना उर्फ संतोष गुलाब रहांगडाले (४५) व सुन्ना उर्फ प्रमोद रहांगडाले (४२, रा चिरेखनी) हे नामदेव पारधी यांच्या घरासमोर आले व तुझ्यामुळे माझा मुलगा मरण पावला, असे बोलू लागले. यावर नामदेव पारधी यांनी, मी तुमच्या मुलाला काय केले? तुमचा मुलगा माझ्यामुळे कसा मरण पावला, अशी विचारणा केली. यावर मुन्ना रहांगडाले व सुन्ना रहांगडाले या दोघांनी माझ्या मुलावर जादू केली व जादूने मारले असे म्हणत नामदेव पारधी यांना शिवीगाळ करून काठीने पाठीवर व डोक्यावर मारहाण केली. तर पिंटू उर्फ सतीश गुलाब रहांगडाले याने थापडबुक्क्यांनी मारहाण केली. त्यानुसार पोलिसांनी बीएनएस ११८ (१), ११५ (२), ३५२, ३ (५) अन्वये गुन्हा दाखल केला.

विशेष म्हणजे, पोलिसांकडून काहीच कारवाई केली जात नसल्याने नामदेव मार्कंड पारधी यांनी शनिवारी (दि.७) उपविभागीय पोलिस अधिकारी, जिल्हाधिकारी व पोलिस अधीक्षकांना अर्ज पाठविला आहे. त्यात त्यांनी तिरोडा पोलिसांनी माझ्या बयाणानुसार गुन्हा दाखल केला नसून, त्यातून मतू माझ्या मुलावर जादूटोणा केलास, त्यामुळे माझा मुलगा मरण पावला' हे आरोपींच्या तोंडचे वाक्य पोलिसांनी बयाणातून गहाळ केले. तसेच जादूटोणा कायद्यान्वये गुन्हा दाखल केलेला नाही. आरोपींवर योग्य कारवाई व्हावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

फिर्यादीच्या पत्नीचा हात मोडला

नामदेव पारधी यांच्या तक्रार अर्जानुसार, ते आपल्या दोन पत्नींसह घरी असताना आरोपी मुन्ना, सुन्ना व पिंटू रहांगडाले हे हातात लाठ्याकाठ्या घेऊन आले. त्यांच्या पाठीमागे गावातील ५० ते ६० माणसे होती. तू म इझ्या मुलावर जादू केली त्यामुळे माझा मुलगा मरण पावला, असे बोलून तिन्ही आरोपींनी नामदेव पारधी यांना घरातून बाहेर ओढत आणले. त्यानंतर त्यांना व त्यांच्या पत्नींना लाथाबुक्क्या व काठ्यांनी मारहाण केली. या मारहाणीत पारधी यांच्या पत्नीचा हात मोडला. दरम्यान, अंधाराचा फफायदा घेत नामदेव पारधी हे घराच्या मागील बाजूने त्यांच्या तावडीतून सुटून तिरोडाच्या दिशेने निघाले. रात्री २ वाजता पोलिस ठाणे गाठून सर्व हकिकत पोलिसांना सांगितली.

पोलिसांनी त्यांना उपचारासाठी उपजिल्हा रुग्णालयात नेले व उपचारानंतर चिरेखनी येथे सोडून दिले. दुसऱ्या दिवशी पत्नी सुभद्रा यांना तिरोडा पोलिस ठाण्यात नेले. त्यानंतर त्यांच्यावर उपजिल्हा रुग्णालय व नंतर गोंदियात केटीएस जिल्हा साम ान्य रुग्णालयात औषधोपचार केले. त्यात हाड मोडल्याचे निदान झाल्याने पत्नीवर सध्या खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

या घटनेत तिरोडा पोलिसांनी जादूटोणाविरोधी कायद्यान्वये आरोपींवर गुन्हा दाखल करणे आवश्यक आहे. अन्यथा अशा प्रकरणात वाढ होण्याची शक्यता नाकारता येत नाही. जादूटोण्यावरून होणारे खून आता जिल्ह्यात थांबले आहेत. ते सुरू होण्याची शक्यताही नाकारता येत नाही. तसेच लोकांच्या मनातून जादूटोण्याचे भूत काढण्यासाठी व अंधश्रद्धा निर्मूलनासाठी प्रशासकीय स्तरावर जनजागृती होणे अनिवार्य आहे.

–प्रकाश धोटे, जिल्हा संघटक, अंनिस, गोंदिया

आता लागलेले निकाल नंतर बदलणार-राजकुमार पुराम

देवरी: पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीत आपल्या पक्षाचा पराभव झाला तरी यात खचून जाऊ नका. या निवडणुकीत ज्या शक्तीच्या विरोधात आपण मुकाबला केला हेच आपले यश आहे.आपल्याकडे संघटनात्मक ताकदीचे मोठे बळ असून, आता लागलेले निकाल नंतर बदलणार असल्याचे मत काँग्रेस पक्षाचे आमगावं–देवरी विधान सभेचे पराभुत उमेदवार राजकुमार पुराम यांनी देवरी येथे शासकिय विश्रामगृहात तालुका काँग्रेस पक्षाच्या वतीने (दि.०५) आयोजीत निवडणुक संबंधात समिक्षा बैठकीत नोंदविले.

तालुका कार्यकारिणीच्या बैठकीत देवरी तालुका काँग्रेस अध्यक्ष संदीप भाटिया यांनी या विधानसभेसह महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत काँग्रेसला सपाटून मार खावा लागला. हरियाणा आणि महाराष्ट्रातील निकालांमुळे कधीकाळी सर्वाधिक मोठा पक्ष असलेला काँग्रेस आता अगदी रसातळाला गेल्याचं चित्र आहे. काँग्रेसची पीछेहाट होण्याची कारणं काय? आगामी काळात काय करणं गरजेचं आहे? आदी मुद्द्यांवर काँग्रेस पक्षाच्या बैठक समिक्षा होणे गरजेचे असल्याचे सांगितले.

देवरी येथील शासकिय विश्रामगृहात आयोजित केलेल्या निवडणूक संबंधातील समिक्षा बैठकित राजकुमार पुराम म्हणाले, "काँग्रेस पक्ष संघर्षातून उभी राहिली आहे.त्यामुळे कांग्रेस पक्ष यश आणि अपयशाची कधीच पर्वा करीत नाहीत."या प्रसंगी काँग्रेस पक्षाचे उमेदवार राजकुमार पुराम,युवा नेते अडँ. दुष्यंत किरसान, मोतीलाल पिहदे, चैनसिंग मडावी,बाबुराव हिडको, जीवन सलामे, पं.स.सदस्य रंजीत कासम प्रल्हाद सलामे, शहर अध्यक्ष कुलदिप गुप्ता, नंदकिशोर बारसे, श्री माटे, वैशाली राजकुमार पुराम यांच्यासह तालुक्यातील काँग्रेस पक्षातील बहुसंख्य कार्यकर्ता आवर्जून उपस्थित होते.या बैठकीचे संचालन अविनाश टेंभरे यांनी तर आभार ओमप्रकाश रामटेके यांनी मानले.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, गोंदिया

निविदा सुचना क्र.१५ सन २०२४-२०२५ (व्दितीय मागणी)

गोंदिया पाणी पुरवठा योजना,(देखभाल व दुरुस्ती)ता.जि.गोंदिया अंतर्गत **हेडवर्क्स व जलशुध्दीकरण केंद्र** येथे Tool and Fire Fighting Equipment's ive चा पुरवठा करणेबाबतच्या कामाची निविदा मजीप्रा कडून मागविण्यात येत आहे. कामाची **अंदाजित किंमत** रू.९४,०६८/– आहे. सदर निविदेचा सविस्तर तपशील दिनांक १२/१२/२०२४ ते दिनांक २३/१२/२०२४ पर्यंत विभागीय कार्यालयामध्ये उपलब्ध आहे.

कार्यकारी अभियंता
महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
विभाग, गोंदिया

अदानी घोटाळ्याच्या संसदीय समिती तर्फे चौकशीकरीता भाकपची निदर्शने

भंडारा –: १० डिसेंबरला जागतिक म ानवाधिकार दिनानिमित्त भाकपच्या देशव्यापी आंदोलनाच्या आवाहनानुसार निषेध दिन पाडण्यात आला.अदानी घोटाळा,मणिपूर हिंसाचार,ईव्हीएम हटाव–लोकशाही बचाव,संविधान बचाव,देश बचाव,म हागाई,बेकारी इत्यादी मागण्यांना घेऊन भाकपच्या वतीने भंडारा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर पक्षाचे जिल्हा सचिव कॉम्रेड हिवराज उके यांच्या नेतृत्वात निदर्शने आंदोलन करून राष्ट्रपतीच्या नावे मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले.

शिष्टमंडळात हिवराज उके,सदानंद इलमे,गजानन पाचे, प्रियकला मेश्राम ,सुशील खांडेकर,महानंदा गजभिये,उर्मिला वासनिक व राजू लांजेवार यांचा समावेश होता.निवेदनात मणिपूरचे मुख्यमंत्री एन बिरेनसिंग यांचा तत्काळ राजीनामा घ्यावे.म णिपूर राज्यात शांतता व सुव्यवस्था स्थापित करण्यात यावे,हिंसाचार ग्रस्त कुटुंबांना तात्काळ मदत करण्यात यावे.अदानी कार्पोरेटचा शेअर घोटाळा,सौर ऊर्जा घोटाळा याबद्दल संयुक्त संसदीय समिती स्थापन करून चौकशी करण्यात यावे,सेबी अध्यक्ष माधवी बुच यांची हकालपट्टी करण्यात यावे, मंत्रालय आणि प्रशास–नातील अदानीच्या दलालांना जेलमध्ये टाकण्यात यावे.जीडीपी आणि वाढत्या बेरोजगारी तसेच महागाई बद्दल उपाययोजना करण्यात यावे.ईव्हीएम हटाव–लोकशाही बचाव, संविधान बचाव, देश बचाव इत्यादी मागण्यांचा समावेश होता.आंदोलनात प्रामुख्याने कॉम्रेड वामनराव चांदेवार, दीपक गजभिये, पांडुरंग खाटीक, अनंता दाणी, संगीता शहारे, प्रताप डोंगरे, किशोर मेश्राम, जयदेव सोनकुसरे, ज्ञानेश्वर मानवटकर, दीपक बनसोड, अशोक साकुरे, नरेंद्र रामटेके, नुरी नैताम, पकली उईके, कोमल उईके, सरस्वती उईके, उषा सूर्यवंशी, छबी पाचे इत्यादींची उपस्थिती होती.

ग्राम पंचायत कार्यालय सोनबिहरी.

पं.स.गोंदिया, जि.प.गोंदिया

निविदा सुचना क्र.१ (पहिली वेळ सन २०२४-२०२५)

जा.क्र.३४० दि.:–१०/१२/२०२४

ग्राम पंचायत सोनबिहरी.अंतर्गत खालील बांधकामांची मोहोरबंद निविदा ब–१ टक्केवारी प्रपत्रामध्ये बांधकाम विभाग जि.प.गोंदिया यांच्या कडे नोंदणीकृत कंत्राटदारांकडून मागविण्यात येत आहे. कोऱ्या निविदा ग्राम पंचायत कार्यालय सोनबिहरी कडून देण्यात येतील.

अ.क्र.	योजनेचे नाव	कामाचे नाव	अंदाजित किंमत	निविदा व फॉर्मची किंमत	निविदेसोबत भरावयाची रक्कम	काम पूर्ण करण्याचा कालावधी	कंत्राटदाराचे वर्ग
१	स्वच्छ भारत मिशन(ग्रामीण) योजना	सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन	६००५८४/–	१०००/–	६०००/–	३ महिने	वर्ग ७ व त्या खालील

निविदा प्रकाशित दिनांक	दिनांक १०/१२/२०२४
कोऱ्या निविदा मिळण्याचा दिनांक	दिनांक ११/१२/२०२४ सकाळी ११.०० वाजेपासून
निविदा दाखल करण्याची सुरुवाती दिनांक	दिनांक ११/१२/२०२४ पासून
निविदा दाखल करण्याचा अंतिम दिनांक	दिनांक १९/१२/२०२४ दु.०२.०० वाजे पर्यंत
निविदा उघडण्याचा दिनांक	दिनांक १९/१२/२०२४ दु.०३.०० वाजे (शक्य झाल्यास)

(टिप :– निविदा पत्रकातील सविस्तर माहिती ग्राम पंचायत कार्यालय सोनबिहरी येथे कार्यालयीन वेळेत मिळेल.)

ग्रामपंचायत अधिकारी
ग्राम पंचायत सोनबिहरी

सरपंच
ग्राम पंचायत सोनबिहरी

मद्यप्राशन करून शाळे–`त गोंधळ घालणाऱ्या शिक्षकाविरुध्द गुन्हा दाखल

आमगावः– पंचायत समिती अंतर्गत येत असलेल्या पदमपुर जिल्हा परिषद वरिष्ठ प्राथमिक शाळेत दारु पिऊन धिंगाणा घालणाऱ्या शिक्षकाविरुध्द आमगाव पोलीस ठाण्यात तक्रार दाखल झाल्याने एकच खळबळ उडाली आहे.शनिवार ७ डिसेंबरला सकाळी १०.३० वाजेच्या सुमारास पदवीधर शिक्षक काशीराम दुलीराम चौरागडे यांनी शाळेत दारुच्या नशेत धिंगाणा घातल्याचे चित्र विद्यार्थ्यासंह इतर शिक्षकांना प्रत्यक्ष बघावयास मिळाले.सदर शिक्षक चौरागडे यांची समजूत काढण्याचा प्रयत्न मुख्याध्यापिकेसह इतर शिक्षकांनी केले,परंतु नशेल असलेल्या शिक्षकाला आपण काय करतोय याचे भानच उरलेले नव्हते.त्यामुळे अखेर..त्रासलेल्या महिला मुख्याध्यापिकेने आमगाव पोलिसांना माहिती दिली,त्यावरुन आमगाव पोलिसांनी शिक्षकाविरुध्द कलम ८५(१)मदका अन्वये गुन्हा नोंदविला आहे.

जगनाडे महाराज मानव जातीचे खरे उद्धारक–खेमेंद्र कटरे

गोंदिया–संत महापुरुष हे कोण्या एका जातीचे नसतात,तर राष्ट्रसंत श्री संताजी जगनाडे महाराजांनी मानव जातीच्या कल्याणासाठी काम केले.यामुळेच ते मानव जातीचे उद्धारक असल्याचे विचार ओबीसी अधिकार मंचचे संयोजक व बेरार टाईम्सचे संपादक खेमेंद्र कटरे यांनी व्यक्त केले.ते येथील एम.जी.पॅरामेडिकल कॉलेजमध्ये(दि.०९)आयोजित संत संताजी जगनाडे महाराजांच्या जयंती कार्यक्रमात बोलत होते.पुढे म्हणाले की,संत महापुरुषांनी केलेल्या कार्यामुळेच आज ४०० वर्षांनतरही संताजींचे विचार त्यांच्या जयंतीच्या माध्यमातून समजून घेत आहोत.संत तुकाराम महाराजांच्या गाथा बुडविण्यात आल्या असल्या परंतु त्यांचे अभंग हे जगनाडे महाराजांना मुखाग्र होते म्हणून आम्ही त्यांचे विचार जाणू शकलो.संत तुकाराम महाराजांचे, छत्रपती शिवाजी महाराज आणि संत जगनाडे महाराज हे शिष्य होते.त्यांच्यासारखे विचार व कार्य आपण सर्वांनी अंगिकारावे असेही कटरे म्हणाले.कार्यक्रमाला ओबीसी संघर्ष समितीचे कोषाध्यक्ष कैलाश भेलावे,संताजी अर्बन बँकेचे संचालक बळीराम डोरले,बहुजन एकता मंचचे सुनिल भोंगाडे,सामाजिक कार्यकर्ता गौरव बिसेन,कॉलेजचे संचालक अनिल गोंडाने,प्राचार्या अनुसया लिल्हारे,प्रा.प्रिती वैद्य,प्रा.छाया राणा,प्रा.रामेश्वरी पटले,प्रा.आरती चैधरी,प्रा.गायत्री बावनकर,राजू रहांगडाले,सौरभ बघेले,राजाभाऊ उंदिरवाडे,श्रीमती योगेश्वरी ठवरे व श्रीमती रूपाली धमगाये हे सर्व कर्मचारी उपस्थित होते.कार्यक्रमाचे संचालन विद्यार्थीनी प्रतीनिधी कु.शिवानी बघेले हिने,तर आभार प्रा. मनीष चौधरी यांनी मानले.

धोकादायक विहीर देतेय मोठ्या अपघाताला निमंत्रण

देवरी: तालुक्यातील शिलापूर ग्राम पंचायत अंतर्गत येत असलेल्या बोरगाव येथील वॉर्ड क्र.१ मध्ये जीर्ण विहिर आहे. सदर विहिरीचा उपयोग शुन्य असू–नही त्या विहिरीला बुजविण्याचे काम ग्राम पंचायत अथवा प्रशासनाच्या वतीने करण्यात आले नाही. यामुळे ही विहिर धोकादायक स्थितीत पोहोचली आहे. जि. प. शाळेसमोरच विहिर असल्याने चिमुकल्यांचा वावर असतो. यामुळे अपघाताची शक्यता नाकारता येत नाही. परंतु, डोकेबंद करून असलेल्या ग्राम पंचायतीचे याकडे लक्ष जाताना दिसून येत नाही. यामुळे एखाद्या अप्रिय घटनेनंतरच दखल घेणार का? असा प्रश्न गावकऱ्यांकडून उपस्थित केला जात आहे.

बोरगाव येथे वॉर्ड क्र.१ येथे जुनी विहिर आहे. सदर विहिर जीर्ण झाल्याने मागील १५ ते २० वर्षापासून या विहिरीच्या उपयोग केला जात नाही. विहिरीला सुरक्षात्मक कठडे असले तरी ते सुरक्षेच्या दृष्टीकोनातून धोकादायक स्थितीत आले आहेत. विशेष म्हणजे, सदर विहिर जिल्हा परिषद शाळेच्या आवारात आहे. यामुळे विद्यार्थ्यांची वर्दळ असते. शाळेतील मुलांना खेळण्यासाठी मैदान नसल्यामुळे शाळेसमोरील खुल्या आवारामध्ये मुलं खेळ खेळत असतात. सदर विहीर पूर्णतः जीर्ण झालेली असून, शाळेतील विद्यार्थ्यांसाठी तसेच नागरिकांसाठी धोकादायक ठरत आहे. विहिरलगत थोडासा मैदान असल्यामुळे शाळा प्रशासनाच्या वतीने विद्यार्थ्यांना क्रीडा शिक्षण देण्यासाठी उपयोगात आणला जातो.

त्यामुळे कधीही धोका निर्माण होऊ शकतो. तर दुसरीकडे नजिकच समाज भवन असल्याने या ठिकाणी विविध कार्यक्रम होत असतात. यामुळे जीर्ण अवस्थेत पडून असलेली ही विहिर धोकादायक ठरत आहे. असे असूनही ग्राम पंचायत प्रशासनाकडून सातत्याने विहिर बुजविण्याकडे दुर्लक्ष केले जात आहे. गावकऱ्यांना या संदर्भात प्रशासनाला माहिती देवून परिस्थितीत लक्षातही आणून दिली. परंतु, डोळेबंद करून असलेल्या ग्राम पंचायत प्रशास–नाचे समस्येकडे लक्ष जाताना दिसून येत नाही. त्यामुळे एखाद्या अप्रिय घटनेनंतरच झोप उघडणार काय? असा प्रश्न संतप्त गावकऱ्यांकडून केला जात आहे.

विहीर ठरली डास उत्पत्तीचे केंद्र

बोरगाव येथे जीर्ण अस–लेली विहिर मागील १५ वर्षांपासून उपयोग नाही. यामुळे विहिरीत दुषित पाणी साचून आहे. शिवाय केरकचरा व पावसाळ्यातील पाण्याची साठवणूक होत असल्याने डासांचा प्रादुर्भाव वाढला आहे. यामुळे ही विहिर रोगराई उत्पत्तीचे केंद्र ठरली आहे.

या प्रकारामुळे गावकऱ्यांचे आरोग्य धोक्यात आले असून आरोग्य विभागाचाही याकडे कानाडोळा आहे. यामुळे ग्राम पंचायत व तत्पर असलेला आरोग्य विभागाच्या कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह निर्माण केले जात आहेत.



विधानसभा अध्यक्षपदी बिनविरोध निवडीबद्दल मुख्यमंत्र्यांकडून अभिनंदन

मुंबई : सभागृहातील योग्य वर्तन आणि शिस्त ही लोकशाहीचा आत्मा आहे. शिस्तशीर आणि वक्तशीर या बाबी लोकप्रतिनिधींना आवश्यक बाबी एड.राहुल नार्वेकर यांच्याकडे आहेत. संवादातून चर्चेतून लोकशाही समृद्ध होत असते. राज्यातील जनतेला न्याय देण्याच काम सभागृह करीत असते. सभागृहाच्या अध्यक्षांना कायद्याचे अधिक बारकावे माहीत आहेत.एड. राहुल नार्वेकर यांच्या रूपाने कायद्याच उत्तम ज्ञान असणारे अध्यक्ष सभागृहाला मिळाले असल्याचे मत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केले. विधानसभेच्या अध्यक्षपदी निवडीबदल मुख्यमंत्री फडणवीस अभिनंदनपर प्रस्तावावर बोलत होते.

मुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले की, पुन्हा अध्यक्ष होण्याचा मान आतापर्यंत चारच जणांना मिळाला आहे. यामध्ये एड.नार्वेकर यांना हा बहुमान मिळाला आहे. विधानसभा अध्यक्षांचे दालन सभागृहातील सर्व पक्षासाठी हक्काचे दालन असते. सभागृहात कितीही भांडण झाले तरी हक्काने अध्यक्षांकडे जाता येते. अध्यक्ष दोन्ही बाजूचे ऐकतात. यावेळीही अध्यक्षांकडे ही जबाबदारी आहे. लोकशाहीत चांगला विरोधी पक्ष असणे हे सुदृढ लोकशाहीचे लक्षण असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

या विधिमंडळात जनसामान्यांच्या प्रश्नांवर अधिक चर्चा होऊन लोकशाही अधिक सदृढ होईल. राज्यातील जनतेला न्याय देण्याचे काम या सभागृहात होत असते.सभागृहातील सदस्य आणि कार्यपद्धती महाराष्ट्रातील जनतेला न्याय देण्याचे काम करतात. या सभागृहातील परंपरांचे मान, सन्मान निश्चितपणे कायम राहील. या पुढील काळात नवनिर्वाचित अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या कार्यकाळात सभागृहातून व्यापक जनहिताचे निर्णय होतील. विधिमंडळाच्या प्रथा परंपरा यांची उंची राखत सर्व सदस्यांना न्याय देण्याची भूमिका अध्यक्ष एड. नार्वेकर यांनी त्यांच्या मागील अडीच वर्षाच्या काळात प्रामाणिकपणे पार पाडली आहेत.

अध्यक्ष नार्वेकर यांची भूमिका समन्यायी-उपमुख्यमंत्री शिंदे

विधानसभेच्या सभागृहात प्रत्येक घटकाला समान न्याय देतानाच सामजिक समतोल राखत समन्यायी भूमिका घेवून विधानसभा अध्यक्ष एड. राहुल नार्वेकर यांची कामकाजाची हातोटी आहे. सलग दुसऱ्यांदा अध्यक्षपदी विराजमान होण्याचा त्यांना मान मिळाला आहे. त्यांचे नाव विधीमंडळाच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहीले जाईल, असा विश्वास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी येथे व्यक्त केला.

विधानसभेच्या अध्यक्षपदी बिनविरोध निवडीबदल उपमुख्यमंत्री श्री. शिंदे अभिनंदनपर प्रस्तावावर बोलत होते. एड.नार्वेकर यांचे विधानसभा अध्यक्ष म्हणून कामकाज कौतुकास्पद आहे. गेल्या अडीच वर्षात त्यांनी चांगले काम केले हे त्याचे उत्तम उदाहरण आहे. गेल्या अडीच वर्षात त्यांनी सखोल अभ्यास करून राज्याच्या हितासाठी अनेक चांगले निर्णय दिले आहेत. त्यांनी अध्यक्षपदाची उंची अधिक वाढवली आहे, असे उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी सांगितले.

उपमुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या संविधानावर देशाचा, राज्याचा कारभार चालतो. सर्वसामान्य व्यक्ती संविधानामुळे पंतप्रधान, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री होवू शकतो. राज्यात आता विकासाचे व प्रगतीचे नवे पर्व सुरु झाले आहे. अध्यक्षांच्या कायद्याच्या ज्ञानाचा उपयोग सर्वसामान्यांचे प्रश्न सोडवण्यास होईल. त्यामुळे या सभागृहाचे पावित्र्य राखत राज्याला विकासाच्या महामार्गावर नेण्यास सर्वांनी प्रयत्न करूया असेही उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी यावेळी सभागृहात सांगितले.

महाराष्ट्र विधिमंडळाचे सभागृह हे देशाला दिशा देणारे सभागृह

उपमुख्यमंत्री अजित पवार विधानसभा अध्यक्षांच्या अभिनंदन प्रस्तावावर बोलताना म्हणाले, महाराष्ट्र विधिमंडळाचे सभागृह हे देशाला दिशा देणारे सभागृह आहे. या सभागृहाची गरिमा सर्वांनी राखली पाहिजे. या सभागृहाला चांगला अध्यक्ष लाभला असल्याने त्यांच्या अध्यक्ष पदाच्या कार्यकाळात लोकहितकारी व परिणामकारक निर्णय होतील असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला

कायद्याची उत्तम जाण असणारा अध्यक्ष सभागृहाला लाभला आहे. या बरोबरच त्यांनी राजकीय प्रश्नांचा बारकाईने अभ्यास केला आहे. त्यांनी सभागृहासमोर आलेल्या प्रश्नांवर तितक्याच ताकदीने उत्तर देऊन सभागृह उत्तम चालविले असल्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी यावेळी सांगितले. यावेळी विधानसभा सदस्य सर्वश्री जयंत पाटील ,नाना पटोले,सुरेश धस,जितेंद्र आव्हाड,नितीन राऊत, विश्वजीत कदम, रोहित पाटील यांनीही अभिनंदनपर मनोगत व्यक्त केले.

देवेंद्र फडणवीस यांनी घेतली महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदाची शपथ

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची प्रमुख उपस्थिती,उपमुख्यमंत्री म्हणून एकनाथ शिंदे,अजित पवार यांनी घेतली शपथ

मुंबई: राज्याचे ३१ वे मुख्यमंत्री म्हणून राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी देवेंद्र सरिता गंगाधरराव फडणवीस यांना मुख्यमंत्री पदाची शपथ दिली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रमुख उपस्थितीत ऐतिहासिक आझाद मैदानावर झालेल्या शपथविधी समारंभात मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्यासमवेत उपमुख्यमंत्री म्हणून एकनाथ गंगुबाई संभाजी शिंदे, अजित आशाताई अनंतराव पवार यांना राज्यपालांनी पद आणि गोपनियतेची शपथ दिली. राज्याच्या मुख्य सचिव सुजाता सौनिक यांनी शपथविधी सोहळ्याचे संचलन केले.

शपथविधी कार्यक्रमास मंचावर केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, केंद्रीय आरोग्य मंत्री जगतप्रकाश नड्डा, केंद्रीय भूपृष्ठ परिवहन व महामार्ग मंत्री नितीन गडकरी, केंद्रीय कृषि मंत्री शिवराजसिंह चौहान, केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन, केंद्रीय वाणिज्य व उद्योगमंत्री पियुष गोयल, केंद्रीय परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ एस जयशंकर, केंद्रीय पर्यावरण मंत्री भुपेंदर यादव, केंद्रीय माहिती तंत्रज्ञान व रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव, केंद्रीय अवजड उद्योगमंत्री एच डी कुमारस्वामी, केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान, केंद्रीय सूक्ष्म मध्यम लघू उद्योगमंत्री जितनराम मांझी, केंद्रीय दळणवळण मंत्री जोतिरादित्य सिंधिया, केंद्रीय संसदीय कार्यमंत्री किरेन रिजिजू, केंद्रीय मत्स्य व्यवसाय व पशुसंवर्धन मंत्री राजीव रंजन सिंह, केंद्रीय अन्न प्रक्रिया उद्योगमंत्री चिराग पासवान, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, आंध्रप्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू, बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार, अरुणाचल प्रदेशचे मुख्यमंत्री पेमा खांडू, आसामचे मुख्यमंत्री हिमंत बिस्वा शर्मा, छत्तीसगढचे मुख्यमंत्री विष्णूदेव साय, गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत, गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल, हरियाणाचे मुख्यमंत्री नायब सिंग सैनी, मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री मोहन यादव, मेघालयचे मुख्यमंत्री कॉनरॅड संगमा, राजस्थानचे मुख्यमंत्री भजनलाल शर्मा, त्रिपुराचे मुख्यमंत्री मानिक साहा, उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी, पुद्दुचेरीचे मुख्यमंत्री एन रंगस्वामी, ओडिशाचे मुख्यमंत्री मोहन मांझी, मणिपूरचे मुख्यमंत्री एन बिरेन सिंह, नागालँडचे मुख्यमंत्री नेफ्यु रिओ, सिक्कीमचे मुख्यमंत्री प्रेमसिंह तमांग, केंद्रीय राज्यमंत्री सर्वश्री रामदास आठवले, मुरलीधर मोहोळ, प्रतापराव जाधव, रक्षाताई खडसे, विविध राज्याचे

उपमुख्यमंत्री सर्वश्री केशव प्रसाद मौर्य, ब्रजेश पाठक, पवन कल्याण, राजेंद्र शुक्ला, अरुण सावो, विजय शर्मा, प्रेमचंद बैरवा, विजयकुमार सिन्हा, सम्राट चौधरी, कनक बर्धन सिंह देव, प्रवती परिदा, चौना मेन, प्रेसतोन त्यांसोंग, यांथुंगो पटॉन, टी. आर. झेलियांग, एस धार, श्रीमती दिया कुमारी यांच्यासह साधू, संत, महंत, विविध धर्मांचे गुरु, राज्यातील खासदार, आमदार, विविध राजकीय पक्षांचे वरिष्ठ नेते, उद्योग, क्रीडा, मनोरंजन क्षेत्रातील विविध मान्यवर, विशेष निमंत्रित अतिथी उपस्थित होते.शपथविधी सोहळ्याची सुरुवात राष्ट्रगीत व राज्य गीताने करण्यात आली.

विभागीय समितीच्या वतीने धादरी/उमरी व येगाव ग्रामपंचायतींची तपासणी

गोंदिया – संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान सन २०२२-२३ अंतर्गत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धेच्या अनुषंगाने नागपूर विभागीय तपासणी समितीच्या वतीने जिल्ह्यातील विभागीय स्पर्धेसाठी पात्र असलेल्या तिरोडा तालुक्यातील धादरी/उम तसेच अर्जुनी मोरगाव तालुक्यातील येगाव ग्रामपंचायतींची तपासणी ५ व ६ डिसेंबर रोजी करण्यात आली.

राज्य शासनाच्या वतीने गाव स्वच्छ, सुंदर व आदर्श होण्यासाठी दरवर्षी संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानच्या माध्यमातून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम राबविण्यात येते. या अनुषंगाने सन २०२२-२३ या वर्षात जिल्हापरिषद गट स्पर्धा, जिल्हास्तर स्पर्धा राबविण्यात येऊन जिल्हात अर्जुनी मोरगाव तालुक्यातील येगाव ग्रामपंचायत प्रथम व तिरोडा तालुक्यातील धादरी ग्रामपंचायत द्वितीय क्रमांकावर असल्याने सदर ग्रामपंचायती विभागस्तरिय स्पर्धेसाठी पात्र ठरल्या होत्या. त्यानुषंगाने दिनांक ५ डिसेंबर रोजी तिरोडा तालुक्यातील धादरी/ उमरी ग्रामपंचायतीची विभागीय तपासणी करण्यात आली. यावेळी सहायक आयुक्त (आस्थापना) तसेच समिती अध्यक्ष विवेक इलमे, सहायक आयुक्त (विकास) तसेच समिती सचिव कमलकिशोर फुटाणे, अधीक्षक अभियंता तसेच समिती सदस्य श्री बेले, समिती सदस्य सहायक गटविकास अधिकारी छत्रपाल पटले, समिती सदस्य विस्तार अधिकारी अमोल महल्ले यांनी तपासणी केली. यावेळी गटविकास अधिकारी सतीश लिल्हारे, जिल्हा पाणी व स्वच्छता विभागाचे भागचंद्र रहांगडाले, विस्तार अधिकारी पंचायत शितेश पटले,विस्तार अधिकारी अनुप भावे, विस्तार अधिकारी बडोले, समूह समन्वयक अनुप रंगारी, तालुका वैद्यकीय अधिकारी यांच्यासह इतर विभागाचे कर्मचारी उपस्थित होते.

दिनांक ६ डिसेंबर रोजी अर्जुनी मोरगाव तालुक्यातील येगाव ग्रामपंचायतीची विभागीय तपासणी करण्यात आली. यावेळी सहायक आयुक्त (आस्थापना) तसेच समिती अध्यक्ष विवेक इलमे, सहायक आयुक्त (विकास) तसेच समिती सचिव कमलकिशोर फुटाणे, अधीक्षक अभियंता तसेच समिती सदस्य श्री बेले, समिती सदस्य सहायक गटविकास अधिकारी छत्रपाल पटले, समिती सदस्य विस्तार अधिकारी अमोल महल्ले यांनी तपासणी केली. यावेळी गटविकास अधिकारी वैद्य सर, जिल्हा पाणी व स्वच्छता विभागाचे भागचंद्र रहांगडाले, विस्तार अधिकारी पंचायत सहारे, विस्तार अधिकारी आरोग्य मोरेश्वर धोंगडे, समूह समन्वयक सुरेश पटले यांच्यासह इतर विभागाचे कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी पाणी व स्वच्छतेच्या अनुषंगाने तपासणी करून शाळा व आंगणवाडी येथे भेट देऊन तपासणी करण्यात आली.

घरफोड्या करणारा अट्टल चोरटा मुद्देमालासह जेरबंद

माजी आमदार बनसोड यांच्या घरी केली होती चोरी

गोंदिया : तिरोडा येथील माजी आमदार दिलीप बनसोड यांच्या घरातून १८.४७ लाख रुपयांची चोरी करणाऱ्या अट्टल व मुख्य चोरट्याला अटक करण्यात स्थानिक गुन्हे शाखा व तिरोडा पोलिसांना यश आले आहे. दरम्यान, पोलिसांनी चोरट्यांनी २१ लाख रूपयांचा मुद्देमाल हस्तगत करून जप्त केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार ७ नोव्हेंबर २०२४ रोजी रात्री ८ ते रात्री १० वाजेच्या सुमारास माजी आमदार दिलीप बनसोड यांचे राहते घरी कोणीही हजर नसतांना कोणीतरी अज्ञात चोरट्यांनी घरातून सोन्याचे दागिने व नगदी असा १८ लाख ४७ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल चोरी केल्याचे बनसोड यांचे चालक फिर्यादी सोमप्रकाश फुलचंद बिसेन (वय ४२ रा. मेंढा, ता. तिरोडा) यांच्या तक्रारीवरून तिरोडा पोलिसांनी अपराध क्रमांक ८२७/२०२४ कलम ३३१(४), ३०५ (अ) भा. न्याय संहिता- २०२३ अन्वये ८ नोव्हेंबर २०२४ रोजी गुन्हा करून वरिष्ठांनी दिलेल्या निर्देश सूचनाप्रमाणे उपविभागीय पोलीस अधिकारी साहिल झरकर यांचे मार्गदर्शनात स्था.गु.शा. गोंदियाचे पोलीस निरीक्षक दिनेश लबडे तसेच तिरोडाचे पोलीस निरीक्षक अमित वानखेडे यांचे नेतृत्वात घरफोडी करणाऱ्या गुन्हेगारांचे शोध व आरोपीतांना जेरबंद करण्याकरीता वेगवेगळी पथके नेमण्यात आलेली होती. स्था.गु.शा. व तिरोडा पथकातील पोलीस अधिकारी - अंमलदार अज्ञात चोरटे आरोपीतांचा शोध घेत असताना घटनास्थळ वरून प्राप्त सीसीटीव्ही फुटेज तसेच गोपनिय माहितीच्या आधारे १० नोव्हेंबर रोजी संशयावरून आरोपी रामन्ना उर्फ रामचंद्र पोचन्ना ठाकरे (वय ३५ वर्षे रा. देसाईगंज/वडसा) यास ताब्यात घेवुन जेरबंद करण्यात आले होते.गुन्ह्याचे अनुषंगाने त्यास सखोल चौकशी विचारपूस केली असता त्याने घरफोडी करणारा मुख्य सूत्रधार अट्टल चोरटा आरोपी विष्णू खोकण विश्वास (वय ३४ वर्षे रा. अरुण नगर, ता. अर्जुनी मोरगाव असे असल्याचे सांगितले. या आधारे पोलीस पथकाकडून मुख्य सूत्रधार अट्टल आरोपीचा साधारण मागील एक महिन्यापासून गोंदिया जिल्ह्यासह भंडारा, नागपूर जिल्हा तसेच तेलंगणा, छत्तीसगड राज्यात शोध घेवून अखेर मुख्य चोरटा आरोपी विष्णु विश्वास यास देसाईगंज/वडसा येथून ताब्यात घेऊन जेरबंद करण्यात आले. गुन्ह्याचे अनुषंगाने त्यास केलेली विचारपूस तपास चौकशी दरम्यान गुन्हा केल्याचे कबुल केले. दरम्यान, पोलिसांनी आरोपीचे ताब्यातून ४ नग सोन्याचे बिस्कीट एक जुनी वापरती पल्सर गाडी तर यापूर्वी अटक केलेल्या आरोपी पासून नगदी २४ हजार ५०० रूपये असा साधारण २१ लाख रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत करुन जप्त करण्यात आले आहे.गुन्ह्याचा अधिकचा तपास सहाय्यक पोलीस निरिक्षक मसराम करीत आहेत.

गोंदिया: महिला व बाल विकास विभागाच्या ४ मार्च २०१३ रोजीचे शासन निर्णयानुसार जिल्हास्तरावर दर महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी महिला लोकशाही दिन आयोजित करण्यात येते. त्यानुसार महिलांच्या कोणत्याही विभागाशी संबंधित समस्या, वैयक्तीक समस्या, गाऱ्हाणी व अडीअडचणी ऐकून घेण्यासाठी १६ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली महिला लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आले आहे. या लोकशाही दिनामध्ये सर्व महिला कर्मचारी, महिला मंडळ, बचतगट व इतर महिलांसाठी काम करणाऱ्या संस्था येथील महिला थेट सभेमध्ये येवून वैयक्तीक तक्रार नोंदवू शकतात.

महिला लोकशाही दिन १६ डिसेंबरला

यायप्रविष्ठ प्रकरणे, विहित नमून्यात नसणारे व आवश्यक कागदपत्राच्या प्रती न जोडलेले अर्ज, सेवा विषयक, आस्थापना विषयक बाबी, तक्रार/निवेदने वैयक्तीक स्वरुपाचे नसेल तर ते अर्ज स्विकारण्यात येणार नाही. तरी सर्व पिडीत महिलांनी जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयात व्यक्तीश: येऊन आपली तक्रार तीन प्रतीत सादर करावी. अर्जाचा नमूना जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, नविन प्रशासकीय इमारत, तिसरा मजला, खोली क्र.३६, जयस्तंभ चौक, गोंदिया या कार्यालयात नि:शुल्क प्राप्त होईल. तालुका स्तरावर दर महिन्याच्या चौथ्या सोमवारी तहसिलदारांच्या अध्यक्षतेखाली महिला लोकशाही दिन आयोजित करण्यात येते. त्यासाठी संबंधित तालुक्याचे बाल विकास प्रकल्प अधिकारी (ग्रामीण) यांच्याकडे अर्ज सादर करावे. अर्जाचा नमूना बाल विकास अधिकारी यांचेकडे नि:शुल्क प्राप्त होईल. अधिक माहितीसाठी जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय गोदिया येथे संपर्क साधावा.

गोंदियात काँग्रेस उमेदवाराचा पुनर्मोजणीसाठी अर्ज

गोंदिया : गोंदिया विधानसभा मतदारसंघातील चार मतदान केंद्रावरील व्हीव्हीपॅट व ईव्हीएमची नव्याने मतमोजणी करावी यासाठी महाविकास आघाडीतील काँग्रेसचे पराभूत उमेदवार गोपालदास अग्रवाल यांनी निवडणूक प्रशासनाकडे १ लाख ८९ हजार रुपयांचे शुल्क जमा केले आहे. येत्या ४५ दिवसांत व्हीव्हीपॅटची मोजणी केली जाणार आहे.

गोंदिया विधानसभा मतदारसंघातून भाजपचे उमेदवार विनोद अग्रवाल हे ६१ हजार ४६४ मतांनी निवडून आले. गोंदिया विधानसभा मतदारसंघात विधानसभा निवडणुकीत एकूण १५ उमेदवार निवडणूक रिंगणात होते; पण थेट लढत ही भाजपचे उमेदवार विनोद अग्रवाल आणि काँग्रेसचे उमेदवार गोपालदास अग्रवाल यांच्यातच होती, तर हे दोन्ही उमेदवार सलग तिसऱ्यांदा समोरासमोर होते.

भाजपचे उमेदवार विनोद अग्रवाल ६१ हजार मतांनी विजयी झाले. त्यामुळे काँग्रेस उमेदवार गोपालदास अग्रवाल यांनी या मतदारसंघातील चार मतदान केंद्रांवरील मतमोजणीवर शंका उपस्थित करीत आक्षेप घेतला. त्यानंतर जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे १ लाख ८९ हजार रुपयांचे शुल्क भरून चार मतदान केंद्रांवरील व्हीव्हीपॅट पुनर्मोजणीची मागणी केली आहे. त्यामुळे निवडणूक आयोगाच्या नियमानुसार आता ४५ दिवसांत या चार मतदान केंद्रांवरील मतमोजणी केली जाणार आहे.

राष्ट्रीय लोक अदालत १४ डिसेंबरला

गोंदिया : राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण दिल्ली यांचे निर्देशान्वये व महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण मुंबई यांचे मार्गदर्शनाप्रमाणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जिल्हा न्यायालय गोंदिया यांचेमार्फत जिल्हा न्यायालय, कामगार न्यायालय, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग तसेच जिल्ह्यातील तालुका विधी सेवा समित्यामार्त सर्व तालुका न्यायालयामध्ये १४ डिसेंबर २०२४ रोजी राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. न्यायालयात दाखल करण्यापूर्वीचे प्रकरणे तसेच न्यायालयात दाखल असलेली तडजोडपात्र फौजदारी प्रकरणे, एन.आय.एक्ट कलम १३८, बँक रिकव्हरीची प्रकरणे, वैवाहिक/कौटुंबिक वादाची प्रकरणे, कामगारांची प्रकरणे, भूसंपादनाची प्रकरणे, दिवाणी प्रकरणे- भाडे, बँक वसुली, प्राधिकरणाची कर्ज वसुली प्रकरणे, विद्युत व पाणी बीलाची (चोरीची प्रकरणे सोडून) इत्यादी तसेच सर्वच प्रकारची तडजोडपात्र दाखल तसेच दाखलपूर्व प्रकरणे ठेवण्यात येणार आहेत.प्रकरणे सामंजस्याने मिटविण्याकरीता न्यायाधीश, तज्ञ वकील व सामाजिक कार्यकर्ते यांचे पॅनल मदत करणार आहे.

तरी ज्या पक्षकारांनी आपली दाखल प्रकरणे सदर लोक अदालतीमध्ये तडजोडीकरीता ठेवायची आहेत त्यांनी संबंधित न्यायालयात १३ डिसेंबर २०२४ पर्यंत अर्ज दाखल करावे असे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाने कळविले आहे.

समृद्धी महामार्गासाठी जमिनी संपादित करण्यास सुरुवात

गोंदिया :- नागपूर-मुंबई समृद्धी महामार्गाचा आता गोंदियापर्यंत विस्तार करण्यात येत आहे. या महामार्गाच्या कामाला सुरुवात झाली असून, जिल्ह्यातील तिरोडा, गोंदिया तालुक्यातील शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

या महामार्गाच्या विस्ताराने गोंदिया ते मुंबई हे अंतर ८ ते १० तासांत गाठणे शक्य होणार आहे. यामुळे जिल्ह्यातील कृषी क्षेत्राला चालना मिळण्यास मदत होणार आहे. समृद्धी मार्गामुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या दारी समृद्धी येणार आहे.

जिल्ह्यातील अर्थव्यवस्था प्रामुख्याने कृषीवर आधारित आहे. २ लाख १० हजार हेक्टरवर लागवड क्षेत्र आहे. यापैकी १ लाख ९० हजार हेक्टरवर धानाची, तर जवळपास १२ हजार हेक्टरवर भाजीपाल्याची लागवड केली जाते. धानावर प्रक्रिया उद्योग नसल्याने शेतकऱ्यांना हमीभावाने धानाची विक्री करून मोकळे व्हावे लागते. परिणामी शेतकऱ्यांची फक्त आर्थिक प्रगती झालेली नाही. गेल्या तीन-चार वर्षांपासून शेतकरी ऊस, भाजीपाला, फळ बागा लागवडीकडे वळत आहे. ही दिलासादायक बाब आहे. मात्र, शेतकऱ्यांनी उत्पादित केलेला भाजीपाला, फळे मोठ्या बाजारपेठेत पोहोचविण्याच्या जलद सोयी नाहीत. त्यामुळे स्थानिक बाजारपेठेत त्याची विक्री करून शेतकऱ्यांना समाधान मानावे लागते. त्यातून फारसे उत्पन्नही मिळत नाही. शासनाने समृद्धी महामार्गाचा गोंदियापर्यंत विस्तार करण्याचा निर्णय घेत त्याच्या कामाला सुरुवात केल्याने जिल्ह्यातील शेतकऱ्यांना एक आशेचा किरण गवसला आहे. या समृद्धी महामार्गामुळे शेतकऱ्यांना जलद वाहतुकीची सोय उपलब्ध होणार आहे. भाजीपाला, दूध, फळे हे लवकर खराब होणारे घटक आहेत. त्यामुळे त्यांची जेवढ्या जलदगतीने वाहतूक होईल, तेवढे सोयीचे होणार आहे.

शेतमालाला मिळणार बाजारपेठ

समृद्धी महामार्गामुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांना नागपूर, मुंबई, नाशिकसह इतर मोठ्या बाजार- पेठेत शेतमाल पोहोचवून चार पैसे अधिकचे पदरात पाडून घेण्यास मदत होणार आहे. त्यामुळे हा महामार्ग शेतकऱ्यांच्या जीवनात समृद्धी आणणारा मार्ग ठरणार आहे. सध्या या महामार्गासाठी तिरोडा आणि गोंदिया तालुक्यातील शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. त्यामुळे जमिनीला सोन्याचा भाव आला आहे.

राइस मिल उद्योगाला मिळेल संजीवनी

गोंदिया तालुक्यातील बिरसी येथे आंतरराष्ट्रीय दर्जाचे विमानतळ आहे. या विमानतळावरून कार्गो सेवा सुरू करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. कार्गो सेवा सुरू झाल्यास जिल्ह्यातील राइस मिल उद्योगाला संजीवनी मिळू शकते. शिवाय कृषी क्षेत्राला चालना मिळण्यास मदत होईल. लगतच्या मध्य प्रदेश आणि छत्तीसगड राज्यातील शेतक?यांनाही बिरसी विमानतळावरून शेतमाल बाहेर पाठवून अतिरिक्त नफा मिळविण्यास मदत होईल. त्यातच आता समृद्धी महामार्गाचीसुद्धा मदत होणार आहे.

१० पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळांना मिळणार कंत्राटी शिक्षक

४२ शाळांचा समावेश,गावातील व्यक्तीला मिळणार संधी

गोंदिया:- स्थानिक स्वराज्य संस्थांच्या १० व १० पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळांत डी.एड.,बी.एड. अर्हताधारक बेरोजार उमेदवारांना कंत्राटी तत्वावर नियुक्ती देण्यात येणार आहे. यामुळे या शाळा बंद होण्याचे संकट टळणार आहे. तर विद्यार्थ्यांचे दुसऱ्या शाळेत समायोजन करण्याची अडचण सुद्धा दूर होणार आहे.



जिल्ह्यात १० व त्यापेक्षा कमी पटसंख्या असलेल्या ४२ शाळांमध्ये कंत्राटी स्वरूपात डी.एड., बी.एड. अर्हताधारक बेरोजगारांना शिकविण्याची संधी दिली जाणार आहे. त्यासाठी १५ हजार रुपये मानधन दिले जाणार आहे. राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या १० व १० पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळांत डी.एड.,बी.एड. अर्हताधारक बेरोजगार उमेदवारांना कंत्राटी तत्वावर नियुक्त करण्यासाठी शासन निर्णय काढण्यात आला आहे. ही नियुक्ती प्रक्रिया सन २०२३-२४ च्या संचमान्यतेनुसार १० व १० पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळांतील दोन पैकी एक नियुक्ती कंत्राटी पद्धतीने करण्यात यावी, शाळेची पटसंख्या १० पेक्षा जास्त झाल्यास शासन निर्णय २३ सप्टेंबर २०२४ नुसार नियमित शिक्षक दिला जाणार आहे.

पटसंख्या वाढल्यास मिळेल नियमित शिक्षक

१० पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळेतील विद्यार्थ्यांची संख्या वाढल्यास त्या शाळेत नियमित शिक्षक देण्याची तरतूद सुद्धा नवीन आदेशात करण्यात आली आहे. त्यामुळे या निर्णयाने कमी पटसंख्येच्या शाळा बंद होण्याचे संकट टळले आहे.

दोन शिक्षक कार्यरत असल्यास एक कंत्राटी द्यावा

सन २०२३-२४ च्या संचमान्यतेनुसार १० व १० पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळांत दोन शिक्षक कार्यरत असल्यास त्यापैकी एका शिक्षकांचे प्रचलित कार्यपद्धतीचा अवलंब करुन समायोजन झाल्यावर, प्रत्यक्ष पद रिक्त झाल्यानंतरच अशा शाळेतील दुसरा शिक्षक कंत्राटी पद्धतीने नियुक्त करण्याच्या सुचना केल्या आहेत.

स्थानिकांना मिळेल प्राधान्य

उमेदवाराची निवड करताना उमेदवार संबंधित शाळेच्या ग्रामपंचायत हद्दीतील स्थानिक रहिवासी असणाऱ्या उमेदवाराचा विचार करण्यात येईल. शिक्षणात समान असल्यास वयाने मोठा असणाऱ्याला प्राधान्य दिले जाणार आहे.